आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १२५ । शनिवार १४ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## सुनेत्रा पवारच राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष!



**पुणे :** उपमुख्यमंत्रीपदानंतर सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या (अजित पवार) राष्ट्रीय अध्यक्षपदी येत्या १५ दिवसांत निवड केली जाईल, असे पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी जाहीर केले.दुसरीकडे, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावरून सुनील तटकरे आणि शशिकांत शिंदे या दोन्ही गटांच्या प्रदेशाध्यक्षांमध्ये जुंपली आहे. अजित पवार यांच्या पश्चात पक्षाच्या अध्यक्षपदी कोणाची निवड होणार याची उत्सुकता होती. प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची चर्चा होती, पण त्यांनी इन्कार केला होता. दोनच दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या वेळी पक्षाची भविष्यातील वाटचाल आणि दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर चर्चा झाल्याचे समजते. या भेटीनंतर राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचीच निवड होणार हे आता निश्चित झाले आहे.

# मंत्रालयात लाचखोरीचे 'औषध'



## नरहरी झिरवाळ यांच्या खात्यातील दोन कर्मचाऱ्यांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) छापा टाकत दोन कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले. महायुती सरकारच्या काळात मंत्रालयात खुलेआम लाचखोरी सुरू असल्याचा आरोप ठेवत नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे.

लातूरमधील एका औषध दुकानदाराच्या रद्द केलेल्या परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी मंत्री झिरवळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात



**या भ्रष्टाचाराच्या साखळीत सध्या फक्त एक 'प्यादा' पकडला गेला असला, तरी या साखळीचे धागेदोरे वरपर्यंत पसरलेले असल्याचा संशय आहे. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून मंत्रालयात पैशांशिवाय फाईल हलत नाही, अशी चर्चा सर्वसामान्यांमध्ये सुरू आहे. अनेक अधिकारी मंत्र्यांना पैसे द्यावे लागतील, अन्यथा काम होणार नाही असे सांगून लाखो रुपयांची आगाऊ मागणी करतात अशीही तक्रार वारंवार पुढे येत असताना या घटनेमुळे त्यावर शिक्कामोर्तब झाला आहे.**



लिपिक राजेंद्र ढेरंग याला ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. लाचेची ही रक्कम खासगी सचिव रामदास गाडे यांच्या सांगण्यावरून घेतल्याचे ढेरंग यांनी पोलिसांना सांगितले. दरम्यान यामुळे झिरवळ यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

याबाबत काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे की, 'लातूरमधील एका औषध दुकानदाराचा रद्द झालेला परवाना पुन्हा नूतनीकरण करून देण्यासाठी ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात कार्यरत लिपिक राजेंद्र ढेरंगे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. ही रक्कम खासगी सचिवांच्या सांगण्यावरून घेतल्याचे ढेरंगे याने पोलिसांना कबूल केल्याची माहिती समोर आली आहे.

सरकारने मंत्रालयातील दलालांवर करडी नजर आणि भ्रष्टाचारमुक्त शासन अशा घोषणा केल्या मात्र मंत्रालयातील खासगी सचिव आणि कर्मचाऱ्यांनीच या दाव्यांची पोलखोल केली.

जनतेसाठी मंत्रालय खरोखरच पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त व्हावे यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक आहे. मुख्यमंत्र्यांनी झिरवळ यांचा तात्काळ राजीनामा घेऊन निष्पक्ष चौकशीस मार्ग मोकळा करावा ही आमची ठाम मागणी आहे.



**मी दोन दिवसांपासून दिल्लीत आहे. काल जो काही प्रकार झाला, तो अतिशय चुकीचा होता. असे व्हायला नको होते. राजेंद्र ढेरंग हे लिपिक म्हणून काम करतात. सुनावणीचे कागदपत्र तयार करण्याचे काम त्यांच्याकडे आहे. ते मुळचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कर्मचारी आहेत. त्यांना उसनवारीवर या विभागात घेतले होते. त्यांच्याकडून हा प्रकार घडला. या प्रकाराला कुठेही पाठिशी घालणार नाही.**

**– नरहरी झिरवाळ**
**अन्न व औषध प्रशासन मंत्री**

## जिल्हा रूग्णालयाकडून दिव्यांगांच्या तपासणीला नकार; डॉक्टरांचा निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर– जि ल्हा शासकीय रूग्णालयात दर बुधवारी होणारी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया बुधवारी अचानक ठप्प झाल्याने जिल्हाभरातून आलेल्या दिव्यांग बांधवांचे मोठे हाल झाले. दिव्यांग बोर्डावरील डॉक्टरांनी एका सामाजिक संस्थेकडून होत असलेल्या कथित बदनामीचा निषेध करत तपासणी व प्रमाणपत्र वितरणाचे काम बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्या हस्तक्षेपानंतर केवळ १०० टक्के दिव्यांग असलेल्या रूग्णांची तपासणी करण्यात आली, तर इतरांना तपासणीविना माघारी जावे लागले.

**जिल्हा शासकीय रूग्णालयात दिव्यांग तपासणीसाठी अधिकृत बोर्ड कार्यरत आहे. या बोर्डामार्फत दर बुधवारी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून येणार्या दिव्यांगांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र अत्यावश्यक असल्याने दर आठवड्याला मोठ्या संख्येने दिव्यांग व त्यांच्या नातेवाईकांची उपस्थिती असते. अनेकांना येण्या–जाण्याचा खर्च, प्रवासाची गैरसोय आणि सोबत एका व्यक्तीची गरज भासते. मात्र बुधवारी सकाळी रूग्णालयात पोहोचलेल्या दिव्यांगांना तपासणी प्रक्रिया बंद असल्याचे समजताच नाराजीचा सूर उमटला.**

काहींनी लांबच्या तालुक्यांतून प्रवास करून आले असल्याचे सांगितले. दरम्यान, दिव्यांग बोर्डावरील सर्व डॉक्टरांनी सोमवारी (९ फेब्रुवारी) जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. घोगरे यांना पत्र देत, गेल्या एक वर्षापासून एका सामाजिक संस्थेकडून सातत्याने बदनामी होत असल्याचा आरोप केला. या पार्श्वभूमीवर आम्ही दिव्यांग बोर्डावर काम करणार नाही, असा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तपासणीसाठी अधिकृत अधिकार बोर्डावरील डॉक्टरांकडेच असल्याने व पर्यायी यंत्रणा नसल्यामुळे डॉ. घोगरे यांनी डॉक्टरांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. दिव्यांगांचे हाल लक्षात घेऊन त्यांनी कामकाज सुरू ठेवण्याची विनंती केली.

त्यानंतर केवळ १०० टक्के दिव्यांग असलेल्या रूग्णांची तपासणी करण्यात आली; मात्र इतर दिव्यांगांना प्रमाणपत्र न मिळाल्याने निराश होऊन परतावे लागले. दरम्यान, पुढील बुधवारी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण नियमितपणे होणार की नाही, याबाबत अनिश्चितता कायम आहे. प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करून सेवा सुरळीत करण्याची मागणी दिव्यांग बांधवांकडून होत आहे

## महत्त्वाचे..

### मंत्रिमंडळात खांदेपालटाची शक्यता

मुंबई : शिवसेनेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाकरी फिरवण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. लोकसभा निवडणुकीपासून ते पालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पक्षाला मिळालेले यश–अपयश लक्षात घेऊन पक्षात बांधणी केली जाणार आहे. कोकण पश्चिम महाराष्ट्र सोडला तर इतर जिल्ह्यातील मंत्र्यांना झालेल्या निवडणुकांमध्ये फारशी चांगली कामगिरी करता आली नाही. यावरून एकनाथ शिंदेंनी ३ ते ४ मंत्र्यांचे कान टोचले असून लवकरच मंत्रीमंडळात त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याच्या तयारीत एकनाथ शिंदे असल्याचे कळते. शिवसेनेच्या सर्व जिल्हासंपर्क प्रमुख, नेते आणि सचिवांना संघटना बांधणीसाठी दौरे करण्याच्या सूचना दिलेल्या आहे.

### झापुक । zupuk

**तिचा चेहरा**
**पाहून आरसाही**
**झाला मुका**
**चेहऱ्यावरचा मेकअप**
**पाहून टिकली**
**झाली बुका**

**नवनाथ कुताळ**
९४२२२३१८२५

## धाराशिवमध्ये दोन्ही शिवसेना एकत्र!

### भाजपाला सत्तेपासून दूर ठेवणार..?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**धाराशिव :** जिल्हा परिषद निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. स्पष्ट बहुमताचा 'मॅजिक फिगर' २८ असताना, सत्ता स्थापनेसाठी भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि शिवसेना (शिंदे गट) नेते तानाजी सावंत यांच्यात जोरदार चुरस पाहायला मिळत आहे. भाजपला रोखण्यासाठी शिंदे गटाची शिवसेना, ठाकरे गटाची शिवसेना आणि काँग्रेस एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, जिल्हा परिषदेत तानाजी सावंत यांच्या नेतृत्वाखाली सत्ता स्थापन करण्यासाठी ठाकरे गटाची शिवसेना आणि काँग्रेस बाहेरून पाठिंबा देण्याच्या तयारीत आहेत. मात्र, हे समीकरण जुळवताना सावंत यांच्यासमोर पक्षांतर्गत गटबाजीचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. शिवसेनेतीलच एक गट भाजपच्या संपर्कात असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

**सध्याच्या राजकीय गणितानुसार दोन प्रमुख समीकरणे**

■ **समीकरण १ (भाजपच्या बाजूने):**
**भाजप – १९**
**शिवसेना**
**(शिंदे गटातील सावंत समर्थक वगळून) – ७**
**राष्ट्रवादी (अजित पवार गट) – ६**
**अपक्ष – ३**
**एकूण: ३५**

■ **समीकरण २**
**(भाजपविरोधी आघाडी):**
**शिवसेना (शिंदे गट) – १५**
**ठाकरे गटाची शिवसेना + काँग्रेस – १०**
**अपक्ष – ३**
**एकूण: २८ (मॅजिक फिगर)**

धाराशिव जिल्हा परिषदेत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजप १९ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. शिंदे गटाच्या शिवसेनेला १५ जागा, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ६ जागांवर यश मिळाले आहे. ठाकरे गटाच्या शिवसेनेला केवळ ७ जागांवर समाधान मानावे लागले असून काँग्रेसला ३ जागा मिळाल्या आहेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मात्र एकही जागा जिंकता आलेली नाही. **(पान ४ वर)**

## 'आरटीई'चा लाभ घरापासून १ किमी परिसरातील शाळांमध्येच

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राज्यातील शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या सुधारित कार्यपद्धतीनुसार, ऑनलाइन अर्ज करताना पालकांना त्यांनी नोंदविलेल्या निवासस्थानाच्या एक किलोमीटर परिसरातील शाळाच दिसणार आहेत. त्याचप्रमाणे, प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरतानाच आवश्यक कागदपत्रे जोडावी लागणार आहेत.

**शिक्षण विभागाचा नवा निर्णय**

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. 'आरटीई'च्या २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत कालानुरूप सुधारणा करण्यासाठी, तसेच नवीन नियम, आवश्यक बाबींचा समावेश करून शासनाला शिफारस करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली २९ जानेवारी २०२५ रोजी समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यावर नागरिकांचे अभिप्रायही विचारात घेण्यात आले. त्यानंतर समितीच्या शिफारशींनुसार आरटीई २५ टक्के प्रवेशासाठीची सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली.

आतापर्यंत पालकांना ऑनलाइन अर्ज करताना शाळा निवडण्याची, कागदपत्रे प्रवेशावेळी सादर करण्याची मुभा होती. **(पान ४ वर)**

## कांद्याच्या ट्रकने साडेचार वर्षाच्या बालकाला चिरडले!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** कोपरगाव–संगमनेर रस्त्यावर जवळके चौफुली येथे कांद्याच्या ट्रकने दिलेल्या धडकेत साडेचार वर्षाच्या लहानग्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. हा अपघात शुक्रवारी पाच वाजेच्या सुमारास घडला.



मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेरकडून कोपरगावच्या दिशेने येत असलेला कांद्याने भरलेला ट्रक(क्रमांक आर .जे.१४ जी.आर ४०३५) जवळके चौफुली परिसरात आला असता सदर गाडीने आंश विनोद जयस्वाल (वय साडेचार वर्ष) या बालकास धडक दिली यात तो जागेवरच ठार झाला. हे कुटुंब मुळचे मध्य प्रदेश येथिल असुन गेल्या दहा वर्षापासुन जवलके येथे सुतार काम करुन आपली उपजिवीका चालवीतात. या परिवारास अंश शहा एकुलता एक मुलगा होता. दरम्यान, जवळके चौफुली हा मार्ग सतत वर्दळीचा असून जड वाहनांची मोठ्या प्रमाणात ये–जा सुरू असते. नागरिकांनी **(पान ४ वर)**

## अजित पवारांच्या विमान अपघाताची होणार एएआयबी चौकशी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या संदर्भात केंद्रीय उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी एएआयबीची चौकशी लावली आहे.

एएआयबी ही स्वतंत्र चौकशी संस्था असून ती केंद्रीय हवाई उड्डान मंत्रालयाच्या अंतर्गत येत नाही. या चौकशी यंत्रणेला जगातील कोणत्याही चौकशी यंत्रणेची मदत मागून

**राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री असताना एएआयबीची स्थापन करण्यात आली होती. आपल्या देशात विमान दुर्घटनेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी करण्याकरिता संघटना पाहिजे म्हणून या चौकशी समितीची निर्मिती करण्यात आली होती.**

या अपघाताची चौकशी करता येते अशी तरतूद आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले आहेत.

तसेच, या घटनेची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी झाली पाहिजे, अशीही मागणी त्यांनी केली होती. त्यानुसार, आता चौकशी सुरू झाल्याचे दिसून येते. दुर्घटनेतील सत्य समोर आलं पाहिजे आणि अपघातसंदर्भाने मुळात दोनच गोष्टी या चुकीच्या असू शकतील. एकतर वैमानिकाचा दोष किंवा विमानाचा दोष. त्यामुळे अपघाताची सगळी चौकशी झाली पाहिजे अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. या पलीकडे कोणती चौकशी करण्याची समिती असेल त्याची सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मागणी करेन. पण, एएआयबीला चौकशीचे सर्वाधिकार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिली.

## पक्षकारांना ईमेलद्वारे मिळणार नोटीस !

**पुणे महसूल विभागाची डिजिटल क्रांती; 'पेपरलेस' आणि 'कॅशलेस' कामकाजाकडे वाटचाल**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील जमीन महसूल सुनावणीच्या प्रक्रियेत पारदर्शकता तसेच प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्य सरकारने क्रांतिकारी पाऊल उचलले असून पक्षकारांना आता इलेक्टॉनिक मेल (ई–मेल) द्वारे नोटीस बजाविणे कायदेशीर ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलमांत त्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूलच्या प्रचलित पद्धतीनुसार, सुनावणीची नोटीस प्रत्यक्ष घरपोच किंवा टपालाद्वारे पाठवली जात होती. यात नोटीस न मिळणे, पत्ता न सापडणे किंवा नोटीस स्वीकारण्यास नकार देणे अशा तांत्रिक कारणांमुळे सुनावणी लांबणीवर पडत होती. मात्र, कलम २३० मध्ये सुधारणा करण्यात आल्यामुळे अधिकृत ईमेल आयडीवर पाठवलेली नोटीस कायदेशीररीत्या बजावण्यात आली आहे, गृहीत धरण्यात येणार आहे. राज्यात जमिनीशी संबंधित साधारणतः १२ हजार प्रकरणे मंत्रालय स्तरावर प्रलंबित आहेत. अनेकदा केवळ नोटीस बजावण्याच्या प्रक्रियेतच महिन्यांचा कालावधी जातो. या निर्णयामुळे वेळेची बचत **(पान ४ वर)**

## शिर्डीत भक्तीचा महापूर!

■ १४ किमीची भव्य 'साई परिक्रमा'
■ देश–विदेशातील लाखो भाविक नतमस्तक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** पहाटेची थंडी, आसमंतात घुमणारा 'ॐ साई राम'चा अखंड जयघोष, फुलांनी सजलेला साईबाबांचा भव्य रथ आणि अनवाणी पायांनी श्रद्धेने चालणारे लाखो भाविक अशा भक्तीमय वातावरणात आज (शुक्रवारी) शिर्डी येथे १४ किलोमीटरच्या भव्य 'साई महापरिक्रमे'ला उत्साहात प्रारंभ झाला. सलग सातव्या वर्षी आयोजित 'साई परिक्रमा महोत्सवा'त देश–विदेशातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

'श्री साईबाबा हयातीत असताना गावाच्या



सीमाभोवती परिक्रमा करत असत, असा उल्लेख 'श्री साई सच्चरित्र'मध्ये आहे. कॉलऱ्याच्या साथीदरम्यान साईबाबांनी जात्यावर दळलेले पीठ गावसीमेवर टाकून गावाचे रक्षण केल्याची श्रद्धा आहे. त्याच ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या स्मरणार्थ दरवर्षी या महापरिक्रमेचे आयोजन करण्यात येते. विशेष म्हणजे १३ फेब्रुवारी १९२२ रोजी श्री साईबाबा संस्थानची स्थापना झाली होती. त्या औचित्याने ही परिक्रमा आयोजित होते.

पहाटे ४.३० वाजता खंडोबा मंदिर परिसरातून महाआरतीने परिक्रमेची सुरुवात झाली. शिर्डी पोलीस ठाणे, शिव रस्ता, लुटे **(पान ४ वर)**

## संपादकीय

# शिक्षण व्यवस्थेची अधोगती आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न

देशातील सार्वजनिक शिक्षण व्यवस्था सध्या एका गंभीर संकटातून जात आहे. केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लोकसभेत दिलेल्या लेखी उत्तरानुसार, गेल्या दशकात एकूण ९३ हजारांहून अधिक शाळा बंद झाल्या आहेत. यातील २०१४-१५ ते २०१९-२० या काळात ७४,५०० हून अधिक सरकारी शाळा तर २०२०-२१ ते २०२४-२५ या काळात १८,७०० हून अधिक शाळा बंद झाल्या. उत्तर प्रदेशात २४,५९०, मध्य प्रदेशात २२,४३८, ओडिशात ५,४००, झारखंडात ५,०००, राजस्थानात २,५०० आणि जम्मू-कश्मीरमध्ये ४,४०० शाळा बंद झाल्या. या आकडेवारीत महाराष्ट्रही मागे नाही. २०१४-१५ मध्ये राज्यात ६७,७१७ सरकारी शाळा होत्या, त्या २०१९-२० पर्यंत ६५,८८६ वर आल्या (१,८३१ बंद) आणि २०२३-२४ पर्यंत ६४,८८४ इतक्या राहिल्या (दुसऱ्या टप्प्यात ८५० बंद). म्हणजे एका दशकात महाराष्ट्रात एकूण २,६८१ सरकारी शाळांना कुलूप लावले गेले.

ही केवळ आकडेवारी नाही, तर लाखो मुलांच्या भविष्याशी संबंधित गंभीर सामाजिक-आर्थिक प्रश्न आहे. सरकारी युडायस आकडेवारी सांगते की २०१५ मध्ये देशाच्या लोकसंख्येपैकी २०.७ टक्के मुले शाळांमध्ये नोंदणीकृत होती, ती २०२५ पर्यंत १६.८ टक्क्यांवर घसरली. याच काळात देशाची लोकसंख्या १५.४ कोटींनी वाढली. म्हणजे लोकसंख्येच्या तुलनेत शाळा नोंदणी १९ टक्क्यांनी कमी झाली. प्राथमिक स्तरावर गळती कमी असली तरी माध्यमिक स्तरावर (इयत्ता ९-१०) ती राष्ट्रीय सरासरी १२-१६ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. ग्रामीण भागात शाळा बंद झाल्यानंतर मुलांना अनेक किलोमीटर अंतर कापून शाळेत जावे लागते. गरीब कुटुंबांना वाहतूक खर्च परवडत नाही, मुलींच्या बाबतीत पालक सुरक्षेच्या कारणाने तयार नसतात. परिणामी शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढते.

सरकारचे म्हणणे आहे की कमी विद्यार्थीसंख्या, स्थलांतर आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यासाठी शाळांचे विलीनीकरण केले जाते. पण वास्तव वेगळे आहे. २०१४-१५ ते २०२३-२४ या काळात सरकारी शाळांची संख्या ८ टक्क्यांनी घटून ११,०७,१०१ वरून १०,१७,६६० झाली, तर खासगी शाळांची संख्या १४.९ टक्क्यांनी वाढून ३,३९,५८३ पर्यंत पोहोचली. हा स्पष्ट संकेत आहे की सार्वजनिक शिक्षण व्यवस्था आकुंचन पावत आहे आणि शिक्षणाचे खासगीकरण होत आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी मोफत, परवडणारे शिक्षण देणे ही राज्याची जबाबदारी आहे. ती बाजाराच्या हाती सोपवली जात असल्यास शिक्षणातील समानता आणि सामाजिक न्याय कसा टिकेल?

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही ही स्थिती विदारक आहे. गेल्या दशकात २,६८१ शाळा बंद झाल्या. याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील मुलांवर होतो. प्राथमिक स्तरावर टिकाव सुधारला असला तरी माध्यमिक स्तरावर गळती वाढत आहे. गरिबी, शिक्षणातील रस कमी होणे, वारंवार अपयश आणि संक्रमणातील अडचणी ही प्रमुख कारणे आहेत. शाळा बंदीमुळे मुली आणि गरीब मुले शिक्षणापासून वंचित होतात. याचा दूरगामी परिणाम राज्याच्या आर्थिक-सामाजिक संरचनेवर होईल. लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाऐवजी लोकसंख्याशास्त्रीय संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

शिक्षणतज्ज्ञ स्पष्ट इशारा देतात की शाळा विलीनीकरणामुळे विद्यार्थ्यांना अधिक अंतर प्रवास करावा लागतो, नियमित उपस्थिती कमी होते आणि दुर्बल घटक हळूहळू व्यवस्थेबाहेर पडतात. सरकारचा दावा आहे की कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहिले नाही, पण आकडेवारी आणि वास्तव वेगळे सांगतात. जवळची शाळा गेल्यानंतर लहान मुले आणि मुली शिक्षण सोडून देतात. गुणवत्तेच्या नावाखाली सार्वजनिक व्यवस्था कमकुवत केली जात असल्यास भविष्यात शिक्षणातील असमानता वाढेल.

भारताला २१व्या शतकात ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था बनायची असेल तर शिक्षण व्यवस्था मजबूत करणे अपरिहार्य आहे. पण हजारो शाळा बंद होत असताना हा उद्देश कसा साध्य होणार? शिक्षण हे खर्च नव्हे, तर भविष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक आहे. मग ही गुंतवणूक का कमी होत आहे? प्रत्येक मुलापर्यंत परवडणारे, गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवण्याऐवजी शाळांचे जाळे कमी केले जात असेल तर 'सर्वांसाठी शिक्षण' केवळ घोषणांपुरते राहील.

आज एकीकडे 'परीक्षा पे चर्चा' सारख्या कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली जाते, तर दुसरीकडे सरकारी शाळा बंद होतात, नोंदणी घटते आणि खासगीकरण वाढते. हा विरोधाभास स्पष्ट आहे. विद्यार्थ्यांना तणावमुक्त परीक्षांचे सल्ले देण्यापेक्षा त्यांना जवळच्या, परवडणाऱ्या आणि दर्जेदार शाळा देणे ही शासनाची मूलभूत जबाबदारी आहे. शाळा मजबूत करण्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांसाठी शिक्षण अधिक दूर आणि अवघड केले जात असल्यास जबाबदारी कोण घेणार?

सरकारने आता स्पष्ट आणि ठोस उत्तर द्यायला हवे. शाळा विलीनीकरणाची प्रक्रिया पारदर्शक आणि विद्यार्थ्यांच्या हिताची असावी. ग्रामीण भागात शाळा बंद करण्यापूर्वी पर्यायी व्यवस्था (वाहतूक, निवासी सुविधा) सुनिश्चित करावी. शिक्षणावर गुंतवणूक वाढवावी. शिक्षक भरती, पायाभूत सुविधा, डिजिटल शिक्षण आणि गुणवत्ता वाढीसाठी ठोस योजना राबवाव्यात. खासगी शाळांवर नियंत्रण ठेवून शुल्क नियंत्रण करावे. गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाची हमी द्यावी. महाराष्ट्राने पूर्वी शिक्षण क्षेत्रात अग्रेसरभूमिका बजावली आहे. आजही तीच भूमिका बजावण्याची वेळ आहे. शाळा बंदी थांबवून, सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मजबूत करून राज्याने देशाला दिशा द्यायला हवी. अन्यथा आर्थिक प्रगती आणि सामाजिक न्याय या दोन्हींना धक्का बसेल. शिक्षण हा केवळ आकडेवारीचा विषय नाही, तर राष्ट्रनिर्मितीचा पाया आहे. हा पाया कमकुवत झाला तर राष्ट्राचे भवितव्यच धोक्यात येईल.

# लव जिहाद-धर्मांतर कायदा
## वर्ष उलटूनही कारवाई नाही; निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** लव्ह जिहाद विरोधी आणि धर्मांतरण विरोधी कायद्यासाठी प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाला एक वर्ष झाले. तरी प्रशासनाकडून कोणतीच कारवाई झाली नाही. त्यामुळे प्रशासनाला पून्हा स्मरण करून देण्यासाठी दि. १३ फेब्रुवारी रोजी राहुरी येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

तहसीलदार अमित पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, लव्ह जिहाद, फसवणूक करून किंवा बलपूर्वक करण्यात येणारे धर्मांतर रोखण्याच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी विशेष समिती गठीत करण्याचा निर्णय प्रशासनाने दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी घेतलेला आहे. सदर समितीच्या माध्यमातून राज्यातील परिस्थितीचा अभ्यास करणे. प्राप्त तक्रारींचा आढावा घेणे, इतर राज्यांतील कायद्यांचा अभ्यास करणे व



आवश्यक असल्यास कायद्याचा मसुदा तयार करणे अपेक्षित होते. मात्र सदर शासन निर्णयास एक वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही, अहवाल, शिफारस अथवा कायद्याच्या दृष्टीने पुढील निर्णय झाल्याचे निदर्शनास येत नाही. यामुळे राज्यातील अनेक भागात लव्ह जिहाद, फसवणूक करून केलेले विवाह, ओळख लपवून संबंध प्रस्थापित करणे, तसेच मानसिक दबाव, फसवणूक किंवा धमकीद्वारे धर्मांतरण केल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. भारत देशातील उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तराखंड इत्यादी राज्यांनी या विषयावर कायदे केलेले असताना महाराष्ट्र राज्यात मात्र अद्याप ठोस कायदेशीर तरतूद नसल्याने पीडित महिलांना व कुटुंबांना न्याय मिळण्यात अडचणी येत आहेत. मार्च महिन्यात होणाऱ्या महाराष्ट्र राज्य विधिमंडळ अधिवेशनात लव्ह जिहाद व बलपूर्वक फसवणुकीद्वारे होणारे धर्मांतरण रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा. अशी राज्यातील सामान्य नागरिकांची ठाम व व्यापक मागणी आहे. असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर स्वाती शेजूळ, जयश्री भिंगारकर, प्राजक्ता गावडे, देवयानी हेंबाडे, दिपाली भोंगळ, वर्षा डहाके, चैताली बोरुडे, कमल देवरे, सिंधु डावखर, नंदा घाडगे, मिरा घाडगे, पुनम मासरे, शैला फंड आदिंच्या सह्या आहेत.

# गंगापूर निवडणूक विभागाचा शिक्षकांवर अन्याय,
## कर्तव्यातून सूट मिळूनही गुन्हे दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडली. या निवडणुकीदरम्यान ७ आणि ८ फेब्रुवारीला सीटीईटी परीक्षा असल्याने राज्य निवडणूक आयोगाने ३ फेब्रुवारीला सीटीईटी परीक्षा देणाऱ्या सर्व शिक्षकांना निवडणूक ड्युटीतून सूट दिली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी देखील निवडणूक निर्णय अधिकारी यांना आदेशित केलेले होते. तथापि गंगापूर तालुक्यातील निवडणूक विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुद्दामहून या सूट असलेल्या शिक्षकांवर ''हजर न झाल्याबद्दल'' गुन्हे दाखल केले, ज्यामुळे शिक्षकांना नाहक मानसिक त्रासाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे.याबाबत शिक्षक सेनेच्या वतीने तहसीलदार नवनाथ वागवाड यांना निवेदन देण्यात आले.

निवडणूक विभागातील ढिसाळ नियोजनामुळे हे घडले असून, निवडणुकीच्या दिवशी देखील काही शिक्षकांना धमकीचे फोन आल्याने सीटीईटी पेपर देता आला नाही. निवडणूक विभागाकडून नेहमीच शिक्षकांना सापत्न वागणूक दिली जाते.संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना साहित्य वाटपाच्या नावाने अभय देत सामान्य शिक्षकांवरच अन्याय केला जातो; ग्रामसेवक, तलाठींना प्रत्यक्ष ड्युटी न देता केवळ शिक्षकांना लक्ष्य केले जाते. तसेच सेवा ज्येष्ठ शिक्षकांना इडज करून कनिष्ठांना पर्यवेक्षक म्हणून नेमणूका दिल्या जातात; तहसील कार्यालयातील प्रतिनियुक्तीमुळे विद्यार्थी शिकण्यापासून वंचित राहतात.शिक्षक सेनेने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे गुन्हे रद्द करण्याची, या प्रक्रियेतील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली असून ही अन्यायपूर्ण वागणूक थांबवली नाही, गुन्हे मागे घेतले नाही तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला आहे. या निवेदनावर शिक्षकसेना मराठवाडा उपाध्यक्ष अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बोल्डे, निलेश कहाटे, जावेद पटेल, ज्ञानेश्वर पवार, राजीव शंके आदींच्या सह्या आहेत.

# अ भा श्रीकृष्ण गोपाळ समाज संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** येथे अखिल भारतीय श्रीकृष्ण गोपाळ समाज संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी गावातील साईबाबा मंदिर येथे बैठकी मध्ये नुकत्याच पार पडल्या. यामध्ये टाकळीभान गोपाळ संघटनेच्या अध्यक्षपदी शहादेव ब्राह्मणे, उपाध्यक्षपदी बाळासाहेब सावंत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

तसेच तालुकाध्यक्षपदी विठ्ठल जाधव, जिल्हा क्रीडा अध्यक्षपदी पंकज जाधव यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समस्त गोपाळ संघटना तसेच ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला व निवडीबद्दल नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी गोपाळ समाज बांधवांच्या हितासाठी काम करण्याचे आवाहन नूतन पदाधिकाऱ्यांनी केले.

याप्रसंगी भाऊसाहेब गव्हाणे, सुभाष ब्राह्मणे, एकनाथ सावंत, संजय सावंत, कानिफनाथ जाधव, अनिल लोणारे,विशाल ब्राह्मणे, रोहन लोणारे, किरण ब्राह्मणे, गणेश सावंत, राजू सावंत, एकनाथ पवार, बाबासाहेब सावंत, दादासाहेब सावंत, आकाश लोणारे, दीपक सावंत, शिवनाथ पवार आदीसह समस्त गोपाळ समाज बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते.



# युवकांनी जिद्द, मेहनतीचे ध्येय बाळगून अभ्यास केल्यास यश निश्चित : पो.नि. ठेंगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** युवकांनी जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक मेहनतीचे ध्येय बाळगून अभ्यास केल्यास यश निश्चितच मिळते. सोशल मीडियाच्या आहारी न जाता ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतेही उद्दिष्ट साध्य करता येते, असे प्रतिपादन राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले.



तांदुळवाडी (राहुरी स्टेशन ) येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित विशेष सत्कार समारंभात ते बोलत होते. नॅशनल चॅम्पियनशिप स्केटिंग स्पर्धेत १८ राज्यांमधून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत तृतीय क्रमांक पटकावणारा सार्थक उत्तम बनसोडे, केंद्रीय राखीव सुरक्षा दलामध्ये निवड झालेला सत्यम रायभान धसाळ तसेच तालुक्यातील स्केटिंग स्पर्धेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक ऋषिकेश तारडे यांचा तांदुळवाडी गावाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाळासाहेब पेरणे होते, तर राहुरी तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार संध्या दळवी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे म्हणाले की, गावाची आणि समाजाची वाटचाल योग्य दिशेने व्हावी यासाठी युवकांनी सजग, शिस्तबद्ध आणि कर्तव्यनिष्ठ राहणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसून सातत्यपूर्ण मेहनत, सकारात्मक दृष्टीकोन आणि योग्य मार्गदर्शन यांची जोड आवश्यक आहे. सोशल मीडियामधील आकर्षणांना बळी न पडता वेळेचे व्यवस्थापन करत अभ्यासावर लक्ष केंद्रीत केल्यास यश अटळ आहे.

ते पुढे म्हणाले की, आजचा हा सत्कार समारंभ केवळ व्यक्तींचा गौरव नसून संपूर्ण गावासाठी प्रेरणेचा दीपस्तंभ आहे. स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती, सैन्य भरती किंवा इतर शासकीय सेवांसाठी तयारी करणाऱ्या युवकांना या यशकथा निश्चितच उर्जा देतील. समाजाने अशा गुणवंतांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

यावेळी मनोगत व्यक्त करताना नायब तहसीलदार संध्या दळवी यांनी सांगितले की, गावातील ज्येष्ठ व्यक्तींचे अनुभव आणि मार्गदर्शन हे युवक पिढीसाठी दिशादर्शक ठरते. ज्येष्ठांना मान-सन्मान देण्याची तांदुळवाडी गावाची परंपरा कौतुकास्पद आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, गावपातळीवर विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करणारे, क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणारे आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविणारे उपक्रम सातत्याने राबविले गेले पाहिजेत. अशा कार्यक्रमांमुळे गावात सकारात्मक वातावरण निर्माण होते.

यावेळी सार्थक बनसोडे, सत्यम धसाळ व प्रशिक्षक ऋषिकेश तारडे यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचा, तसेच महसूल विभागातील उल्लेखनीय कार्याबद्दल नायब तहसीलदार संध्या दळवी यांचा गावाच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी गावातील ज्येष्ठ भास्कर भिकाजी पेरणे, भास्कर पेरणे, ज्येष्ठ पत्रकार निसार सय्यद, बाळासाहेब पेरणे, शरदराव पेरणे, बाळासाहेब धसाळ, सर्जेराव पेरणे, अष्टविनायक इंग्लिश मीडियम स्कूलचे प्रिन्सिपल मोहनीराज होन, मोहन खाटेकर, रंगनाथ पेरणे, प्रभाकर म्हसे, तलाठी शरद गिते यांच्यासह महिला व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्रिवेणीश्वर येथे आयोजित भागवत कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील हंडीनिमगाव सुरेशनगर गावच्या मध्यावर असलेल्या व प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेव येथे महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने कथा प्रवक्ते जगन्नाथ संस्कृतीचे विशारद विद्वन परमपूज्य पंडित डॉ.काशिनाथ मिश्रा यांच्या सुश्राव्य वाणीतून आयोजित भागवत कथा सोहळयाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

बुधवार दि.११ फेब्रुवारी पासून सुरू झालेल्या सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होत असलेल्या भागवत कथा सोहळयाला अनेक संत महंतांनी येथे भेट देऊन महादेव त्रिवेणीश्वराचे दर्शन घेतले.कथा सोहळयासाठी आलेल्या सर्व संत महंतांचे त्रिवेणीश्वर महादेव संस्थानचे प्रमुख महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते संतपूजन केले जात आहे.

सदर कथा सोहळयात परमपूज्य पंडित डॉ.काशिनाथजी मिश्रा महाराज हे उपस्थित भाविकांना कथेद्वारे मंत्रमुग्ध करत आहे.रात्री होणाऱ्या कथा सोहळयाच्या निमित्ताने त्रिवेणीश्वर महादेव मंदिर, मंदिर प्रांगणातील अजानबाहू भक्त प्रल्हादगिरीजी महाराज समाधी मंदिर,अन्नपूर्णा माता मंदिर, बजरंग बली व शनिदेव मंदिरावर ही भव्य आकर्षक विद्युत रोषणाई तसेच प्रवेशद्वारासमोरील गणेश मूर्तीजवळ उभारण्यात आलेले कारंजे हे भाविकांचे खास आकर्षण ठरले आहे.

शनिवारी दि.१४ फेब्रुवारी रोजी सांगता होणार असल्याने या प्रसंगी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन त्रिवेणीश्वर महादेव संस्थानचे प्रमुख महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज यांच्यासह हंडीनिमगाव व सुरेशनगर येथील ग्रामस्थ दोन्हीही गावच्या तरुण मंडळ कार्यकर्ते व महाप्रसाद वाटपाचे उत्कृष्ट नियोजन करत असलेल्या त्रिवेणीश्वर भक्त मंडळाच्या सेवेकरी तरुणांनी केले आहे.





# सौंदाळा गावात घेतले जातात राज्यासाठी आदर्शवत निर्णय

नेवासा तालुक्यामध्ये सौंदाळा या गावात एक चांगली वैचारिक पार्श्वभूमी आहे. या परिसरात कॉम्रेड स्वर्गीय सोन्या बापू काळे तसेच दिनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी चांगली तात्विक पार्श्वभूमी निर्माण केली आहे त्यासाठी त्यांनी सामाजिक कार्य करून लोकांमध्ये अनेक चांगले विचार व कृती केली आहे त्याचा वारसा कॉम्रेड बाबा आरगडे केली ४० वर्षे चालवत आहेत.वैचारिक पार्श्वभूमी सौंदाळा गावात असल्याने येथील ग्रामपंचायतने घेतलेले महत्वपूर्ण निर्णय हे राज्यासाठी आदर्शवत ठरणारे आहे.

कॉम्रेड बाबा आरगडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समिती, हमाल माथाडी कामगारांसाठी तसेच पशुहत्या बंदी, जाती जाती निर्मूलन यासाठी मोर्चे आंदोलने व सामाजिक चळवळ करून या परिसरात पुरोगामी विचार वाढवले आहेत. स्वर्गीय आमदार कॉम्रेड वकीलराव लंघे यांच्या समवेत अनेक आंदोलने व जायकवाडी धरणग्रस्तांसाठी आंदोलने करून विधायक व रचनात्मक विचार रुजविण्याचे कार्य केले आहे .

सौंदाळा गावचे सरपंच शरदराव अरगडे यांनी प्रेरणा घेऊन गावामध्ये विविध उपक्रम आजच्या पिढीसाठी राबविले हे खरोखर कौतुकास्पद आहे.''आम्ही जात सोडली तुमचे काय??या संदर्भात गावामध्ये ग्रामपंचायतच्या माध्यमातून कृतिशीलता दाखवली आहे. भारतीय संविधानाप्रमाणे जात व धर्मनिरपेक्षता हा विचार कृतीमध्ये आणण्यासाठी त्यांनी चालवलेले प्रयत्न निश्चितच वाखाणण्यासारखे आहेत. सरपंचांच्या खांद्याला खांदा लावून सर्व जाती धर्मातील लोकांनी ग्रामपंचायत माध्यमातून हा एक आगळावेगळा प्रयोग सुरू केला आहे.

अस्पृश्यता निर्मूलन एक यशस्वी चळवळ भारतामध्ये यशस्वी झालेली मुख्य चळवळ आहे. भारत मातेचे महान सुपुत्र महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निर्मूलनारसाठी अनेक चळवळी केल्या



त्यासाठी त्यांना विरोधी सुद्धा झाला तथापि त्यांनी त्याला न जुमानता भरीव पाया रचना तयार केली त्याचप्रमाणे भारतरत्न व तत्ववेत्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निर्माण होण्यासाठी अपार कष्ट घेतले विशेषतः अस्पृश्यता निर्मूलन करण्यासाठी कायदा तयार करण्याची संविधानात तरतूद करून समाजातील सर्वांना जागे करण्याची मौलिक कार्य केले. आज आपल्या देशामध्ये अस्पृश्यता निर्मूलन एक यशस्वी चळवळ झाली आहे असे असे चित्र आहे.

याच पार्श्वभूमीवर सौंदाळा गावात एक पुढचे पाऊल टाकण्यासाठी प्रयत्न सुरू झाले ही खरोखर आगळी व वेगळी घटना आहे आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत ही सद्भावना मनाशी ठेवली तर देशाचा विकास अतिशय गतिमान होऊ शकतो प्रत्येक माणसाचा धर्म माणुसकी हा आहे. आणि खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे असा महान संदेश स्वर्गीय मानवाचे हित चिंतनारे साने गुरुजी यांनी दिला आहे. जात धर्म भेदाभेद अमंगळ असा संदेश थोर संत यांनी दिला आहे. तरुण पिढीने हा विचार अंगीकारावा व राष्ट्रप्रेम हा सर्वोच्च धर्म मानावा असा संदेश सौंदाळा गावाने दिला आहे

**शब्दांकन-डॉ.अशोकराव ढगे**
**(कृषी शास्त्रज्ञ)**
**खेडले काजळी**

# ध्येयाच्या दिशेने वाटचाल करा : प्रा. संतोष सोनवणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील हंडीनिमगाव शिवारात असलेल्या रोझलॅन्ड इंटरनॅशनल स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. आई -वडील,गुरुजनांचे मार्गदर्शन आयुष्यात मोलाचे असते. सुसंस्कारी बनत यशस्वी होत आपले कर्तृत्व सिद्ध करावे.जीवनात आत्मविश्वास सर्वश्रेष्ठ ऊर्जा होय. जीवनात सकारत्मक दृष्टीकोन ठेवत वाटचाल करावी असे प्रतिपादन जिजामाता उच्च माध्यमिक विभागातील मराठी विभागाचे प्रमुख प्रा.संतोष सोनवणे यांनी केले.

मंगळवार दि. १० रोजी सीबीएसई पॅटर्नचे रोझलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, हंडीनिमगांव ता. नेवासा येथील वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ''आम्हीच आहोत बदल'' या विषयावर व्याख्यान प्रसंगी बोलत होते.

या स्नेहसंमेलन प्रसंगी बाल कलाकरांनी उत्तम प्रकारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत श्रोत्यांची मने जिंकली. प्रसंगी टी.एन. गायकवाड, शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब अंबाडे पाटील, प्राचार्य पिटर बारगळ, संचालक अजित अंबाडे, संचालक निकिता अंबाडे, प्रि प्रायमरी इंचार्ज मनिषा सिन्नरकर, देविदास कुटे, प्रा हेमंत कवडे उपस्थित होते .सूत्रसंचालन श्रद्धा चव्हाण, तनिष्का गवळी, आयुष मचे , पृथ्वीराज शिंदे यांनी केले तर प्रास्ताविक, वार्षिक अहवाल व आभार प्रिन्सिपल पिटर बारगळ यांनी केले.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## शिक्षण विस्ताराधिकारी यांची माका शाळेला भेट



**सोनई** : नेवासा तालुक्यातील माका येथील राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला अहिल्यानगरचे शिक्षण विस्ताराधिकारी भिवसेन पवार यांनी नुकतीच शाळेला भेट दिली. विद्यालयाचे प्राचार्य श्री. जालिंदर शेटे यांनी त्यांचे स्वागत व सन्मान केला. शालेय कामकाज पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

## आदिवासी बांधवांचा अभिमानोत्सव : पंचक्रोशीत एकलव्य जयंतीचे आयोजन

**सोनगाव** : गुरुवर्य एकलव्य यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर आदिवासी समाजात उत्साहाचे वातावरण आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी सोनगाव व हनुमंतगाव पंचक्रोशीत ही जयंती मोठ्या थाटामाटात साजरी केली जाणार असून त्यासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. राज्यातील प्रत्येक गावात एकाच वेळी प्रतिमापूजन, मिरवणुका व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्ञानेश्वर अहिरे, राष्ट्रीय अध्यक्ष, एकलव्य आदिवासी सेना यांनी दिली. आदिवासी भिल्ल समाजाचे श्रद्धास्थान मानल्या जाणाऱ्या एकलव्य यांच्या प्रतिमेचे पूजन गावोगावी मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. ढोल-ताशे, पारंपरिक वाद्यांचा निनाद, डीजेच्या तालावर आदिवासी नृत्य आणि महिलांची पारंपरिक वेशभूषा यामुळे मिरवणुकांना सांस्कृतिक रंगत लाभणार आहे. मिरवणुकांनंतर उपासाचे पदार्थ व फळांचे वाटप करण्यात येणार असून सभांमधून शिक्षण, सामाजिक बांधिलकी व संघटनात्मक एकतेचा संदेश दिला जाणार आहे. जयंतीनिमित्त वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना वह्या-पेन वाटप, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे उपक्रम राबविले जाणार आहेत. अनेक कुटुंबांनी घरांवर एकलव्य यांच्या नावाचे झेंडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. शांतता, शिस्त व सामाजिक सलोखा जपत उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पिंप्री लौकीत प्रवरा दंत महाविद्यालयाचे शिबिर संपन्न




**आश्वि** : संगमनेर तालुक्याच्या पूर्व भागातील सहा ते सात हजार लोकसंख्या असणाऱ्या पिंप्री लौकी अजमपुर गावात प्रवरा मेडिकल ट्रस्टचे दंत महाविद्यालय या विद्यालयाचे सात दिवसाचे मोफत दंतचिकित्सा व उपचार शिबिर पार पडले. ग्रामीण भागातील रुग्णांना दिलासा देणारे प्रवरा ग्रामीण रुग्णालय व ग्रामपंचायत पिंप्री लौकी यांच्या संयुक्त विद्यमानाने शिबीर संपन्न झाले. या शिबिरात दंतचिकित्सा व उपचार आधुनिक पद्धतीने करून ग्रामीण भागातील रुग्णांना दिलासा देण्याचे काम करण्यात येत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सात दिवस विद्यार्थी विद्यार्थ्यांनी गावातील स्वच्छता आरोग्य विषयी माहिती ग्रामस्थांना दिली विविध पट नाट्यातुन व्यसनमुक्ती दारू तंबाखू गुटखा सिगारेट यापासून होणारे दुष्परिणामाचे नाटकामधून माहिती दिली तसेच गावामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी बचत गटाच्या महिला ग्रामस्थ आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाची प्रस्ताविक सामाजिक कार्यकर्ते व जनसेवा मंडळाचे अध्यक्ष भारत गीते यांनी केले.या शिबिरासाठी उत्तर कोरिया येथील तज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

# एक्स्पोच्या माध्यमातून तालुक्याच्या अर्थव्यवस्थेला चालना : आ.आशुतोष काळे

## कोपरगावात 'एक्स्पो २०२६' चे मोठ्या उत्साहात उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : दरवर्षी एक्स्पोच्या माध्यमातून कोपरगावकरांना नवीन काय देता येईल आणि त्याचा कोपरगाव आणि तालुक्याला कसा फायदा होईल याचा प्रयत्न सातत्याने मागील १३ वर्षापासून होत असून एक्स्पोच्या माध्यमातून कोपरगाव शहर व तालुक्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळत असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी म्हटले आहे. कोपरगाव शहरातील महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्ट कोपरगाव येथे लायन्स, लिनेस, लिओ क्लब ऑफ कोपरगाव व क्रेडाई कोपरगाव आयोजित व कर्मवीर शंकरराव काळे उद्योगसमूह प्रायोजित 'एक्स्पो-२०२६' चे उदघाटन आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते.




'एक्स्पो-२०२६' चे उदघाटन प्रसंगी आमदार आशुतोष काळे व मान्यवर.

ते पुढे म्हणाले की, मागील पाच वर्षात कोपरगाव शहराचा पाणी प्रश्न कायमचा सुटून रस्त्यांच्या झालेला विकास व शहर सुशोभीकरणाबरोबरच झालेल्या इतरही विकासकामांमुळे अहिल्यानगर शहरानंतर सर्वात जास्त जमीन खरेदी-विक्री रजिस्ट्रेशन कोपरगाव शहरात होत आहे हे प्रगतीचे लक्षण असून कोपरगाव शहरात झालेल्या विकासकामांमुळे हे होत आहे. आपले कोपरगाव शहर हे असं शहर आहे या शहराला जोडणारा समृद्धी महामार्ग आहे. राष्ट्रीय महामार्ग आहे, मुख्य रेल्वे लाईन असलेले रेल्वे स्टेशन आहे आणि आपल्या तालुक्यात विमानतळ देखील आहे. तसेच पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या गोव्याला जेवढे पर्यटक येत नाही त्यापेक्षा जास्त देश विदेशातून भाविक शिर्डीला येतात असे जगविख्यात प्रसिद्ध श्री साईबाबा देवस्थान आपल्या अगदी जवळ आहे त्याचा फायदा निश्चितपणे कोपरगाव शहर व तालुक्याच्या अर्थकारण वाढीला होतो.त्याप्रमाणेच एक्स्पो देखील कोपरगाव शहर व तालुक्याच्या अर्थकारण वाढीसाठी आपली भूमिका योग्य पद्धतीने बजावत असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी लायन्स, लिनेस व लिओ क्लबचे पदाधिकारी व सदस्य, क्रेडाईचे पदाधिकारी व सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, कार्यकर्ते व कोपरगावकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त

## अमृतवाहिनीच्या १४१ विद्यार्थ्यांचे रक्तदान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत स्वयं स्फूर्तीने रक्तदान शिबिरात सहभाग घेतला असून या शिबिराअंतर्गत १४१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय व एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर संपन्न झाले यावेळी संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ शरयूताई देशमुख, कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे बी गुरव, प्राचार्य डॉ. एम ए वेंकटेश, एनएसएसचे अधिकारी डॉ. जे.आर. रोकडे, प्रा. एस एस काळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना कॅन्सरतज्ञ डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, रक्तदान हे जगातील सर्वश्रेष्ठ दान आहे. विज्ञान आणि मोठी प्रगती केली असली मात्र रक्त अद्याप तयार करता आले नाही. दिवसेंदिवेश वाढणारी अपघात वाढणारे आजार यामुळे रक्ताची मोठी कमतरता भासत आहे. युवकांनी रक्तदानासाठी पुढे आले पाहिजे कारण आपल्या एका रक्तदानामुळे आपण तीन जणांचे प्राण वाचवतो. अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजने सातत्याने सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन काम केले आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सहकार शिक्षण शेती ग्रामीण विकास अशा सर्व क्षेत्रातून केलेले काम हे राज्यासाठी दिशादर्शक असून त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणा मिळणार असल्याचे त्या म्हणाल्या. तर शरयूताई देशमुख म्हणाल्या की, अमृतवाहिनी संस्थेने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबर सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

## देवगड येथे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील देवगड येथील गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावी व बारावी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच देवगड संस्थान च्या ज्ञानसागर सभामंडपामध्ये श्री गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी विद्यार्थ्यांना उंच भरारी घेण्यासाठी शुभाशीर्वाद दिले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मीकांत नांगरे सर यांनी स्वागत करून गुरुवर्य बाबाजींचे संतपूजन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत आपल्या शाळेतील गोड आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी गुरुवर्य भास्करगिरी बाबाजींनी विद्यार्थ्यांना खूप अभ्यास करा,अभ्यासाची ओढ निर्माण करा,जिद्द व चिकाटी अंगिकरून जीवनात यशाचे शिखर गाठण्यासाठी प्रयत्न करा,आपल्या आईवडीलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिद्द बाळगा असे सांगून विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे अभ्यास करण्याचा व जीवनात यश संपादन करण्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांना आशीर्वाद देत परीक्षांसाठी तसेच पुढील उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## क्रीडा प्रकारामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो : डॉ. विलास खर्चे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : खेळामुळे शरीर सुदृढ राहते, आरोग्य चांगले होते तसेच संघभावना, शिस्त व आत्मविश्वास वाढीस लागतो. खेळातून मिळणारा अनुभव पुढील आयुष्यात प्रगतीचा मार्ग दाखवतो. खेळामध्ये विजय-पराभव हे अपरिहार्य असतात. पराभवाला यशाची पहिली पायरी समजून पुढील वर्षासाठी अधिक जोमाने तयारी करावी, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठस्तरीय सन २०२५-२६ च्या कृषि तंत्रज्ञान शिक्षणाच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. विलास खर्चे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजु अमोलिक, छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल (काष्टी)चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे, आंतरविद्या शाखा जलसिंचन विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते. डॉ. खर्चे पुढे म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक योगदानाइतकेच शारीरिक व मानसिक स्वास्थ्य महत्त्वाचे आहे. क्रीडा स्पर्धांमुळे आरोग्य सुदृढ राहते आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडतो.

याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी क्रीडा स्पर्धांमधील सहभागामुळे खिलाडूवृत्ती वाढते, आयुष्याला शिस्त लागते आणि प्रत्येकाने किमान एका क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळवावे, असे सांगितले. स्पर्धेत हार-जीत महत्त्वाची नसून सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी खेळाडूंनी खेळताना संघभावना व मैत्रीभाव जपावा, असे आवाहन केले.

प्रास्ताविक करताना डॉ. विजु अमोलिक यांनी सांगितले की, कृषि तंत्रज्ञान शिक्षणांतर्गत ८२ कृषि तंत्र विद्यालय असून या विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धेत १० संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धांमध्ये ४९७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. खो-खो, व्हॉलीबॉल, कबड्डी, लांब उडी, उंच उडी अशा विविध मैदानी स्पर्धांचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यातील खेळाडू यश काळाणे यांनी सर्व खेळाडूंना क्रीडाशपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिलीप गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक हारदे, दत्तात्रय राजे, हेमचंद्र परदेशी व भावसाहेब बेल्हेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भारत बंदच्या संपास मुळा साखर कामगारांचा जाहीर पाठिंबा




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : १२ फेब्रुवारी रोजी देशातील अनेक कामगार संघटनानी भारत बंद पुकारले असून त्यास बॅक, शेतकरी, कामगार पक्षाचे संघटना, ह्य देशव्यापी संपाला पाठींबा दर्शिवला आहे. अशी माहिती डी. एम. निमसे यांनी दिली. नुकताच मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक पवार, सरचिटणीस डी.एम. निमसे, उपाध्यक्ष कारभारी लोडे, खजिनदार सुभाष सोनवणे, सहचिटणीस भारत पटारे, यांच्या वतीने व महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस राऊत शंकर पाटील,उपाध्यक्ष दत्तात्रय निमसे,यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते.

मुळा कारखाना मेन गेट वर सर्व साखर कामगाराची गेट मिटींग घेऊन आंदोलनास पाठिंबा दिला. संघटनेचे सरचिटणीस डी.एम. निमसे यांनी आपल्या भाषणात सांगितले की साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे व सरचिटणीस राऊ शंकर पाटील यांनी सांगितले की केंद्रीय कामगार संघटनेने या संपात साखर कामगारांनी सहभागी होने बाबत आपल्याला कळविले होते, परंतु अध्यक्ष तात्यासाहेब काळे व राऊ पाटील यांनी त्यांना सुचित केले की सध्या साखर उद्योगचा गळीत हंगाम हा शेवटच्या टप्प्यात आहे.

त्यामुळे साखर कामगार संपात सहभागी होने ऐवजी जाहीर पाठिंबा देतील, त्याप्रमाणे संपूर्ण राज्यातील साखर कामगार संघटनानी जाहीर पाठिंबा दिला आहे. सध्या चे केंद्रातील सरकार हे कामगार विरोधी धोरण घेत आहे. आजच्या भारत बंद मध्ये दहा केंद्रीय ट्रेड युनियनचा या संपात सहभाग आहे. हा संप नवीन लेबर कोड आणि भारत अमेरिकीतील व्यापारी करार विरोधात असल्याचे त्यांनी सांगितले.

या नवीन बदलामुळे देशाच्या कामगार वर्गावर अर्थ व्यवस्था आणि सामान्य नागरिकावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.या चार नविन कामगार कायद्यामुळे कर्मचारी कामगारांचे अधिकार हिरावून घेतले जात आहे या कायद्यामुळे नोकरी ची सुरक्षा राहनार नाही कंपन्यांना कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचेअधिक स्वातंत्र त्यांना मिळेल. तर खाजगी करण किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षा या मुद्यावर पण कर्मचारी आणि कामगार नाराज आहेत. सर्व कामगार युनियनचे पदाधिकारी यांनी या कामगार विरोधी धोरणास प्रखर विरोध केला आहे शेवटी कामगार एक जुटीचा विजय असो अशा घोषणा दिल्या याप्रसंगी गेट मिटींग ला उपस्थित रामकिसन पालवे, योगेश भगत, वामन निमसे, अशोक दरंदले व कामगार उपस्थित होते.

# शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या जागेसाठी विखेंची भेट

## जागेचा तिढा सुटला !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : हिंदवी स्वराज्याचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या जागेचा तिढा सोडविण्यासाठी पुणतांब्याच्या शिष्टमंडळाने काल माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांची शिर्डी येथे भेट घेतली पुणतांबा येथे शिवरायांचा भव्य अश्वारुढ पुतळा असावा म्हणून शिवस्मारक समितीने अंदाजे ४ ५ लाख रुपयांची वर्गणी गोळा केलेली आहे तसेच अंदाजे ३४ लाख रूपये खर्च करून शिवरायांचा ब्राँझचा पुतळा तयार करून घेतला आहे मात्र शिवरायाच्या पुतळ्याची जागा निश्चित होत नसल्यामुळे गेल्या १७ महिन्यापासून पुतळा चांगदेव कारखान्याच्या गोडाऊनमध्ये आहे.



या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी शिवस्मारक समितीचे अध्यक्ष दत्ताधनवटे व सर्व सदस्य व गावातील मान्यवरांनी डॉ सुजय विखे यांची भेट घेतली श्रीधनवटे यांनी पुतळ्याबाबद संपूर्ण माहिती डॉ विखे यांच्यासमोर मांडली अखेर डॉ विखे यांनी पुणतांबा - कोपरगाव रोडलगत भाजीमंडईच्या ठिकाणी जागा निश्चित करण्याचे स्पष्ट केले. तसेच या ठिकाणच्या विस्थापित दुकानदारांचे नियोजित व्यापारी संकुलात पुर्नवसन केले जाईल १५ मार्चपर्यंत आराखडा पूर्ण केला जाईल तसेच निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. मात्र यासाठी सर्व पुणतांबेकरांनी मतभेद विसरून एक झाले पाहिजे असे आवाहन केले. त्यासाठी उपस्थित सर्वांनी होकार दिला.

यामुळे पुतळ्याच्या जागेचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता असून गेल्या १७ महिन्यापासून कारखान्याच्या गोडाऊनमध्ये बंदिस्त असलेल्या महाराजाच्या पुतळा बाहेर येण्याची शक्यता आहे.


## जाहीर नोटीस

अॅड. श्री. जे. आर. नजन
नेवासा कोर्ट

निशाणी नंबर : ७
तयार दिनांक : १३/०२/२०२६
नेमलेली तारीख : १३/०३/२०२६

**नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ञ साहेव, ज्यु.डी. यांचे कोर्टात..**
**वारस चर्चा.अ.नं. १५९/२०२५**

**अर्जदार**
१) मच्छिंद्र धोंडीराम पुंड वय-६२
२) कानिफनाथ धोंडीबा ऊर्फ धोंडीराम पुंड वय-६९ अर्जदार नं. १ व २ धंदा- शेती, दोघे रा. माळीचिंचोरा ता. नेवासा जि. अहिल्यानगर, अ.नं. १ ह.मु. रेणुका नगर, डी.पी, जवळ, गांधी नगर रोड, बोल्हेगाव, अहिल्यानगर मो. ९८६०८४७३०७

**सामनेवाले**
कोणी नाही
मयत
धोंडीराम ऊर्फ धोंडीबा नाथू पुंड
मयत दिनांक १८/०९/१९९७

वरील अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला असून मयताचे वारस म्हणून अर्जदार हेच वारस आहेत, यासाठी सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मयत कै, धोंडीराम नाथू पुंड हे दि. १८/०९/१९९७ रोजी मौजे माळीचिंचोरा ता. नेवासा येथे मयत झालेले आहेत. सदर मयताच्या नावे मौजे माळीचिंचोरा ता. नेवासा येथील नगर भूमापन क्रमांक ५३५ क्षेत्र ५२२.०० चौ.मी. या मिळकतीची भोगवटादार असून त्यास वारसांच्या नावांची नोंद होणे साठी कोर्टातून वारस प्रमाणपत्राची मागणी केली, म्हणून अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणे करिता सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील चौकशी अर्जा संबंधी कुणाचेही काही म्हणणे असेल किंवा कुणाची काही हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द तारखे पासून ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेस या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रा निशी उपस्थित रहावे, उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल. याची नोंद घ्यावी.

असे. आज दिनांक १३/०२/२०२६ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी ही जाहिर नोटीस दिली.

नेवासा
नेमलेली तारीख: १३/०३/२०२६

**तयार करणार**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर नेवासा**

शिक्का

**हुकूमावरुन**
**सहा, अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**कनिष्ठ स्तर, नेवासा**



निशाणी नंबर: ०८
नेमलेली तारीख : २४/०३/२०२६

अॅड. के. जी. पिसाळ
नेवासा कोर्ट

## जाहीर नोटीस

**नेवासा येथील मे. जिल्हा न्यायाधीश-१ साहेब यांचे न्यायालयात**
**दिवाणी चौकशी अर्ज नं.०५/२०२५**

**अर्जदार:**
१. अनंत प्रल्हादराव देशमुख, वय ४२ वर्ष, धंदा शेती,
२. भावार्थ अनंत देशमुख
वय-८ वर्ष, धंदा शिक्षण,
अ.पा.क. अनंत प्रल्हादराव देशमुख
दोघे रा. सुलतानपुर, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अज्ञानाचे नावावरील मौजे सुलतानपुर, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील गट नं. १०५ मधील अज्ञानाचे नावावरील क्षेत्र १ हे. ९३ आर. + ख. ०.०६ वर जमिन विकसीत करून फळबाग लागवड करणेसाठी बँक कर्ज घेण्यास परवानगी मिळणेकामी दिवाणी चौकशी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही म्हणणे असेल किंवा कुणाची काही हरकत असेल तर या सायटेशन नोटीस प्रसिध्द तारखेपासुन एक महिन्याचे आत अथवा दि. २४/०३/२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे. तसेच उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली असे.

**तयार करणार**
**वरिष्ठ लिपीक**
**जिल्हा न्यायालय, नेवासा**

शिक्का

**हुकूमावरुन**
**अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, नेवासा**



## जाहीर प्रगटन

गट नंबर १५६ मौजे पिंपरी लोकाई तालुका राहता जि. अहमदनगर बक्षीसपत्र दस्त क्रमांक २९८०/२०२०, आर आर पावती व सूची २ बाबद.

माझे अशील सौ. संगीता नारायण जाधव, यांची गट नंबर १५६ मौजे पिंपरी लोकाई तालुका राहता जि. अहमदनगर, येथे शेतजमीन असून त्या शेतजमिनीचे पूर्वीचे मालक श्री. नाना माधव सोमवंशी यांनी सुशीला नानासाहेब सोमवंशी यांच्या नावे करून दिलेले बक्षीसपत्र दस्त ज्याचा क्रमांक २९८०/२०२० असून सदरील बक्षीसपत्र दस्त, आर आर पावती व सूची २ हे गहाळ झाले आहे.

असे कि, सदरील बक्षीसपत्र दस्त गहाळ झाल्याबाबद सुशीला नानासाहेब सोमवंशी यांनी पोलीस स्टेशन राहता येथे रीतसर तक्रार केलेली आहे,

असे कि, माझे अशील सौ. सुशीला नानासाहेब सोमवंशी सर्वग्राम फिनकेर प्रा. ली. शाखा कोपरगाव चे कर्ज घेत असल्याकारणाने, तसेच बक्षीसपत्र दस्त मूळ प्रत असल्याकारणाने, कोणास सदरील दस्त सापडली असल्यास किंवा कोणास काही आक्षेप जसे कि तारण, चोळीबांगडी, खरेदी विक्री व्यवहार असल्यास खालील पत्यावर ७ दिवसात संपर्क साधावा, सात दिवसांत आक्षेप न आल्यास सदरील बक्षीसपत्र दस्त गहाळ समजून तसेच कोठेही तारण नाही असे समजून कर्ज प्रकरण पूर्ण करतील.

असे कि, मुदतीनंतर आलेले आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही., करिता सदरील जाहीर प्रगटन.

ठिकाण - राहता
दिनांक ०९/०२/२०२६

**मार्फत (वकील)**
Dipak V.Kunde
Advocate
Reg.No.1287/2014

## पान १ वरुन

### धाराशिव मध्ये दोन्ही शिवसेना एकत्र!

या निवडणुकीत सर्वात मोठा धक्का खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांना बसल्याचे बोलले जात आहे. ठाकरे गटाने ४४ जागा लढवून केवळ ७ जागा जिंकल्या. उलट, तानाजी सावंत यांनी आपल्या मतदारसंघातील १३ पैकी ८ जागा जिंकत दबदबा कायम राखला आहे. बंडखोरी करणारे धनंजय सावंत हेही विजयी झाले आहेत. कोणताही दगाफटका होऊ नये, यासाठी सर्व पक्षांनी निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांना सहलीवर पाठविल्याची चर्चा आहे. सत्ता स्थापनेपर्यंत सदस्य सुरक्षित ठेवण्यावर सर्वच पक्षांचा भर दिसतो आहे. महायुतीला संख्याबळ असले तरी अध्यक्षपद नेमके कुणाच्या वाट्याला जाणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील आपली ताकद वापरून सत्ता काबीज करणार की भाजपविरोधी आघाडी शेवटच्या क्षणी चमत्कार घडवणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### शिर्डीत भक्तीचा महापूर!

वस्ती, बिरोबाबन, साकुरी शिव मार्गावरून हा भक्तीचा प्रवाह वाहत होता. यंदा भाविकांची रांग तब्बल १० ते ११ किलोमीटरपर्यंत पसरल्याचे दृश्य पाहायला मिळाले.या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते युवानेते व माजी खासदार डॉ. सुजय विखे त्यांनी स्वतः रथाची दोरी हाती घेत भाविकांसोबत साईंचा रथ ओढला. साईबाबांची सेवा करण्याची संधी मिळणे हे परमभाग्य आहे, असे ते यावेळी म्हणाले. यंदा प्रशासनाने डीजेवर बंदी घालून परिक्रमा शांततेत पार पाडली. 'विजया एकादशी'चे औचित्य साधून उपवास करणाऱ्या भाविकांसाठी 'ग्रीन अँड क्लीन फाउंडेशन'सह ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी परिक्रमा मार्गावर १०० हून अधिक मोफत फराळ, फळे, चहा व पाण्याचे स्टॉल्स उभारले.

दरम्यान, ना. राधाकृष्ण विखे यांच्या पुढाकाराने परिक्रमा मार्ग २ ते ३ पदरी करण्याचा विकास आराखडा सादर करण्यात आला आहे. पुढील वर्षी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या परिक्रमेची नोंद Guinness Book of Wold Recods मध्ये करण्याचा मानसही व्यक्त करण्यात आला. एकूणच, लाखो भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या महापरिक्रमेने शिर्डीत 'सबका मालिक एक' हा साईबाबांचा संदेश पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

### कांद्याच्या ट्रकने साडेचार वर्षाच्या बालकाला चिरडले!

येथे वेगमर्यादा फलक, स्पीड ब्रेकर व सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. वारंवार अपघात होत असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी जमली. पोलीस पाटील सुधीर थोरात यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. शिर्डी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह पुढील तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात हलविला. ट्रक चालकाला ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

### 'आरटीई'चा लाभ घरापासून १ किमी परिसरातील शाळांमध्येच

मात्र, सुधारित कार्यपद्धतीनुसार, प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करताना कमाल १० शाळांचे पर्याय देता येतील. त्यासाठी संकेतस्थळावर विद्यार्थ्याच्या नोंदविलेल्या निवासस्थानापासून एक किलोमीटर परिसरातीलच शाळा दर्शवल्या जातील. ऑनलाइन सोडत काढताना एक किलोमीटर आणि त्यापेक्षा कमी अंतरावरील शाळांसाठी २५ टक्क्यांतर्गत एका शाळेत उपलब्ध असलेल्या प्रवेशाच्या रिक्त जागांपेक्षा जास्त पालकांकडून अर्ज प्राप्त झाल्यास प्रवेशाच्या पहिल्या फेरीतच त्या शाळेची सोडत प्रक्रिया पूर्ण होईल. सोडतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी एकाच शाळेचे वाटप होईल.

प्रवेशासाठी अर्ज भरतानाच आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. प्रवेशावेळी पालकांनी दाखविलेला पत्ता आणि 'आधार' ओळखपत्रावरील पत्ता एकच असल्याची तपासणी करावी. पत्ताबदल दिसल्यास प्रत्यक्ष तपासणी करावी. शाळेने विद्यार्थ्याला प्रवेश दिल्यास किंवा प्रवेश नाकारल्यास त्याबाबतची पावती पालकांना द्यावी. त्याबाबत शासनाला दिसण्याची व्यवस्था प्रणालीमध्ये असावी, अशा सूचना आहेत.

शाळांनी प्रवेश नाकारल्यास पालकांना ऑनलाइन तक्रार दाखल करता येईल. प्रवेश नाकारणाऱ्या शाळांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार गटशिक्षणाधिकारी, क्षेत्रीय अधिकारी यांना असतील. प्रवेशावेळी विद्यार्थ्याचे आधार कार्ड नसल्यास ते काढून घेण्याची जबाबदारी शाळा, पालकांची राहील. विद्यार्थ्याच्या आधार कार्डवरील तपशील शाळेने आरटीई संकेतस्थळ, सरल प्रणालीत नोंदवणे आवश्यक आहे. शुल्क प्रतिपूर्ती झाल्याचा लघुसंदेश (एसमएमएस) पालकांना पाठवला जाणे, शाळेच्या शुल्काचा तपशील नोंदवण्याची सुविधा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

'प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून जानेवारी ते एप्रिल या कालावधीत राबवावी. २०२६-२७ या वर्षासाठी आणि त्या पुढील वर्षांसाठी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक प्राथमिक शिक्षण संचालकांनी जाहीर करावे. २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया लागू असलेल्या सर्व पात्र शाळांनी नोंदणी करणे बंधनकारक आहे. प्रवेशासाठी प्रवेशस्तर संबंधित शाळेने ठरवावा. पूर्वप्राथमिक वर्गातील प्रवेशासाठी आर्थिक परतावा शासनाकडून लागू असणार नाही. प्रवेश प्रक्रियेदरम्यान पुरेशा साहाय्य केंद्रांची स्थापना प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी करावी. एखाद्या शिक्षण संस्थेची शाळा अन्य शहरात असल्यास त्या ठिकाणी विद्यार्थ्याचा प्रवेश बदलून देता येणार नाही,' असे शासन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

शिक्षण विभागाच्या निर्णयावर आम आदमी पक्षाचे मुकुंद किर्दत यांनी केली. ते म्हणाले, खासगी शाळांना सुमारे २२०० कोटी रुपयांची शुल्क प्रतिपूर्ती सरकारकडून देय आहे. ही रक्कम कमी करण्यासाठीच शासनाने आदेश काढला आहे. शिक्षण हक्क मारला गेला, तरी पैसा वाचला अशा पद्धतीचे धोरण सरकार राबवत आहे. यापूर्वीही मूळ कायद्याला धक्का देण्याचा सरकारचा प्रयत्न न्यायालयाने रद्दबातल ठरवला होता.

आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या दाखल्यांची पडताळणी महाऑनलाइनच्या संकेतस्थळाद्वारे करण्यात येईल. उत्पन्नाचे दाखले तपासण्याचे अधिकार शाळांना असणार नाही. बोगस दाखल्यांचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द करून संबंधित पालकांवर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

आवश्यक कागदपत्रे बालकाच्या जन्माचे प्रमाणपत्र वास्तव्याचा पुरावा भाडेतत्त्वावर राहणाऱ्या पालकांसाठी प्रवेश प्रक्रियेपूर्वीचा नोंदणीकृत भाडेकरार सामाजिक वंचित घटकातील पालकांसाठी जातीचा दाखला अपंगत्वाचे प्रमाणपत्र आर्थिक दुर्बल घटकांतील पालकांसाठी वार्षिक एक लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असल्याचा दाखला

### पक्षकारांना ईमेलद्वारे मिळणार नोटीस !

होईल. टपाल किंवा प्रत्यक्ष नोटीस बजावण्याचा कालावधी वाचणार असून प्रक्रियेत पारदर्शकता येईल, असा दावा महसूल विभागाकडून करण्यात आला आहे.

ईमेल पाठवल्याचा तांत्रिक पुरावा उपलब्ध राहत असल्याने 'नोटीस मिळाली नाही ही सबब आता पुढे करता येणार नसून नोटीस वेळेवर पोहोचल्याने सुनावणीच्या तारखा वारंवार पुढे ढकलाव्या लागणार नाहीत, परिणामी सामान्य नागरिकांना जलद न्याय मिळण्याची शक्यता आहे.

महसूल विभागाने गेल्या काही वर्षांत सात-बारा उतारा डिजिटल करणे, फेरफार नोंदी ऑनलाइन करणे असे अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत. आता नोटीस बजावण्याची प्रक्रिया डिजिटल करून प्रशासनाने 'पेपरलेस' आणि 'कॅशलेस' कामकाजाकडे मोठे पाऊल टाकल्याचा दावाही महसूल विभागाकडून करण्यात आला आहे.

# तालुक्यातील रस्त्यांसाठी ९७ कोटी २५ लाख मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार व कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने संगमनेर तालुक्यातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांसाठी ९७ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामांमुळे नाशिक त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्यासाठी पायाभूत सुविधा टप्प्याटप्याने विकसित केल्या जातील, अशी माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.



> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री गिरीश महाजन या सर्वांच्या माध्यमातून कुंभमेळ्यासाठी येणार्या भाविकांना सुरक्षित आणि वेगवान दळणवळण मार्ग उपलब्ध करण्याच्या दृष्टीने संगमनेर तालुक्यातील रस्त्यांच्या कामासाठी ९७ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे लवकरच रस्त्यांची कामे पूर्ण केली जाणार आहेत. रस्त्यांची दर्जेदार कामे भविष्यातील औद्योगिक व पर्यटन विकासाला पूरक ठरणार आहेत.
>
> **आ. अमोल खताळ (संगमनेर)**

कुंभमेळा आयोजनाच्या दृष्टीने मंजूर झालेल्या रस्त्यांमध्ये संगमनेर पंचायत समिती ते तळेगाव फाटा, तळेगाव फाटा ते निळवंडे फाटा, आणि निळवंडे फाटा ते जांभुळवाडी फाटा मार्गांचा समावेश आहे. या मार्गांसाठी एकूण ९७ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या कामांमुळे भाविकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा मिळेल तसेच तालुक्याच्या पायाभूत विकासाला मोठी चालना मिळेल. सध्या जास्त कालावधी लागणाऱ्या कामांना प्राधान्य देत नियोजित रस्त्यांची कामे मार्गी लावली जात आहेत. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या, त्यांची आस्था व होणारी गर्दी लक्षात घेऊन महायुती सरकार पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

# तरुणाचा संशयास्पद मृत्यू

## मयत तरुणाच्या नातेवाईकांनी घेतली आ. खताळांची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील संगमनेर खुर्द शिवारातील सर्विस रस्त्यावर वैदूवाडी परिसरात राहणारा सुरज सूर्यभान शिंदे (वय ३०, याचा संशयास्पद मृत्यूमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून हा अपघात नसून घातपात असल्याचा गंभीर आरोप वैदू समाज बांधवांनी व्यक्त करत आमदार अमोल खताळ यांची भेट घेऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली.



या घटनेत गंभीर जखमी झालेल्या सुरजला त्याच्या नातेवाईकांनी पुढील उपचारासाठी एसएमबिटी घोटी येथे दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार सुरजच्या डोक्याला जबर मार लागलेला असून हात, पायाला गंभीर जखमा आहेत तसेच बरगड्याही मोडलेल्या आहेत. या जखमा पाहता हा साधा अपघात नसून हा घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे मयत सुरत चे सर्व नातेवाईक व वैदू समाज बांधव यांनी थेट संगमनेर शहर पोलीस ठाण्यात जाऊन सुरजचा अपघात नव्हे तर घातपात झाला आहे असा संशय व्यक्त करत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. मात्र त्या तरुणाच्या मृत्यूचा शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर पुढील गुन्हा दाखल करण्यात येईल असे शहर पोलिसांनी सुरज शिंदे याच्या नातेवाईकांना सांगितले. त्यामुळे शहर पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबाबत नातेवाईकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. या संशयास्पद मृत्यूमुळे संगमनेर शहरासह परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> वैदूवाडी परिसरात एका तरुणाचा मृत्यू अपघात नसून घातपात असल्याचा संशय वैदू समाज बांधवांनी व्यक्त केला आहे. त्यांनी आमदार अमोल खताळ यांची शासकीय विश्रामगृहात भेट घेऊन निवेदन दिले. आमदार खताळ यांनी पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याकडून माहिती घेतली असता, घटना मध्यरात्री घडल्याने सध्या अपघाताची नोंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, त्यामुळे इन-कॅमेरा शवविच्छेदन करण्याचा सल्ला आमदारांनी मयत सूरजच्या नातेवाईकांना दिला. सध्या मृत्यू अपघाती की घातपात, याबाबत चर्चा सुरू आहे.

### डॉ आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्यासाठी नगरपरिषदेला निवेदन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी राहुरी तालुक्यातील व शहरातील संविधान प्रेमी व आंबेडकरी कार्यकर्त्यांचा व डॉ बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा निर्माण समन्वयक समितीच्या वतीने राहुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे उपनगराध्यक्ष गजानन सातभाई मुख्याधिकारी अभिजित हराळे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे, की भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार संविधान निर्माते बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा स्थापित करण्यात यावा जेणेकरून राहुरी शहराच्या वैभवात भर पडणार असुन समाजातील सर्व समाज घटकांसाठी व त्यांच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या योगदानाचा आदर्श भावी पिढीसमोर कायम स्वरुपी स्मरणात राहण्यास मदत होणार आहे. यावेळी शिरीष गायकवाड नगर परिषदेचे विरोधीपक्षनेते अरुण साळवे, कांतीलाल जगधने, पत्रकार आप्पासाहेब मकासरे, माजी नगरसेवक सुनील पवार, नंदुभाऊ शिंदे, मधुकर विधाटे, राजु शेख आदी सह कार्यकर्ते उपस्थित होते.

### भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची ना. विखे यांनी घेतली भेट

**प्रवरानगर :** भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट घेवून अहील्यानगर जिल्ह्याच्या भेटीचे निमंत्रण तसेच राष्ट्रीय अध्यक्ष पदावर निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार समारंभास वेळ देण्याची विनंती केली.

दिल्ली येथील भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय कार्यालयात मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. राष्ट्रीय अध्यक्ष पदावर झालेल्या निवडीनंतर पहीलीच भेट असल्याने अध्यक्ष नितीन नबीन यांचा सत्कार करून अभिनंदन केले.सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील यांचे ''पायोनियर'' जीवनचरित्र त्यांना भेट दिले. राज्यात नुकत्याच संपन्न झालेल्या नगरपालिका आणि महापालिका निवडणुकीत अहील्यानगर जिल्ह्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष आणि महायुतीला मिळालेल्या विजयाची माहीती देवून पक्षाने केलेल्या कामगिरीची माहीती भेटी दरम्यान दिली.



राष्ट्रीय अध्यक्ष पदावर नितीन नबीन यांची निवड झाल्याबद्दल जिल्ह्याच्या वतीने अध्यक्ष नितीन नबीन यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करायचे आहे.याचे निमंत्रण भेटी दरम्यान दिले असून, लवकरच वेळ देण्याचे त्यांनी मान्य केल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. भाजपाच्या केंद्रीय कार्यालयात मंत्री विखे पाटील यांनी राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांची भेट घेतली त्यांनाही जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या यशाची माहीती दिली.माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर तसेच अन्य केंद्रीय पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

सध्या लोकसभेचे अधिवेशन सुरू असल्याने केंद्र सरकारच्या अखत्यारीत येणार्या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री विखे पाटील यांनी संरक्षण मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय मंत्री जेपी नड्डा,केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांचीही मंत्री विखे पाटील यांच्या भेटी घेवून प्रश्नाच्या संदर्भात चर्चा केली. राज्यातील सिंचन प्रकल्पांच्या कामास केंद्र सरकारचे पाठबळ मिळावे म्हणून केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांना मंत्री विखे पाटील यांनी विनंती केली असून प्रकल्प मार्गी लागण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार करीत असलेल्या निर्णयाची माहिती दिली.

### कंपनीत नोकरी करणाऱ्या अश्विनी झाल्या कामगार आयुक्त

#### केंदूरच्या अश्विनी साकोरेंकडून माहेर व सासरचे नाव उज्वल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** केंदूर (ता. शिरूर) येथील कंपनीत नोकरी करणाऱ्या अश्विनी तुषार साकोरे यांनी नुकतेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादित करत सहाय्यक कामगार आयुक्त पदाला गवसणी घालून सासरसह माहेरचे नाव उज्वल केले आहे.

केंदूर (ता. शिरुर) येथील अश्विनी तुषार साकोरे यांनी लग्नानंतर पतीची इच्छा पूर्ण करण्यासाठी एका एमएनसी कंपनी मधील चांगल्या पदावरील नोकरीस पूर्णविराम देत मुलांची कुटुंबाची जबाबदारी भक्कमपणे पार पाडत कोणताही क्लास न लावता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी केली, त्यामध्ये त्यांना पतीसह सासू मंदाकिनी साकोरे व निवृत्त आयटीआय गट निर्देशक असलेले सासरे पाटीलबुवा साकोरे यांची साथ मिळाली, तर सातारा येथे माहेरी आई कमल निकम व वडील जयप्रकाश निकम या शेतकरी कुटुंबात आई वडिलांनी देखील मुलगी अश्विनी हिस कष्टाने शिक्षण देत एमबीएचे शिक्षण दिले होते, तर लग्नानंतर अश्विनीने स्पर्धा परीक्षांचा प्रवास सुरू केला, मात्र काही प्रशासकीय कामामुळे विलंब झाला मात्र नातेवाईक व कुटुंबाची साथ मिळाल्याने अश्विनीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादित करत सहाय्यक कामगार आयुक्त पदाला गवसणी घातली तर अश्विनीच्या यशाबद्दल तिचे कुटुंबियांसह सरपंच अलका पऱ्हाड व उपसरपंच सुषमा पऱ्हाड यांनी अभिनंदन केले आहे.




## निधन वार्ता

### पार्वती तापकीर



**कर्जत :** खांडवी (ता.कर्जत) येथील जेष्ठ महिला पार्वती लक्ष्मण तापकीर यांचे शुक्रवारी (दि.१३) वृद्धापकाळाने निधन झाले. त्या कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांच्या मातोश्री तर खांडवीचे सरपंच प्रवीण तापकीर यांच्या आजी होत.

### विश्राम शेळके



**श्रीरामपूर :** येथील नगरपालिकेचे सेवानिवृत्त अन्न व भेसळ प्रतिबंधक निरीक्षक विश्राम भागाजी शेळके (वय ८५) यांचे गुरूवार, दि. १२ रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ भाऊ, २ मुले, ३ मुली, सुना, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते मुळा-प्रवरा वीज सोसायटीचे सेवानिवृत्त कर्मचारी सुरेश शेळके, श्याम शेळके व मनमाड नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्यक्षा सीमा संजय निकम यांचे ते वडील, माजी नगरसेवक संजय दिनकर निकम यांचे सासरे व ईश्वर, हौशीराम व प्रल्हाद शेळके यांचे थोरले बंधु होत.

### रमेश कांबळे



**वडाळा महादेव :** श्रीरामपुर येथील रमेश बाबुलाल कांबळे (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी मुले २ मुली २ सुना नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते योगेश कांबळे अमोल कांबळे यांचे ते वडील होत.

### संजय तर्हाळ



**पानेगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील कारेगांव येथील प्रगतीशिल शेतकरी संजय दत्तात्रय तर्हाळ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले (वय ४४) त्यांच्या पश्चात आई,पत्नी,भाऊ, एक मुलगा, एक मुलगी , बहिणी मेव्हणे असा त्यांचा परिवार आहे. प्रगतीशील शेतकरी बाजीराव दत्तात्रय तर्हाळ यांचे बंधू होत.



### नावात बदल

माझे जुने नाव अबू हुरेरा मोहम्मद याह्या शेख(माझे पासपोर्ट वरील नाव) असे झाले असून माझे नवे नाव अबुहुरेरा मोहम्मदयाह्या शेख (माझे आधार कार्ड वरील नाव) असे आहे दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही.
प्रतिज्ञापत्र क्र.२५५२२४२०४१२६८१००६१०२४९
दिनांक -१८/०८/२०२५

### नावात बदल

माझे लग्न पूर्वीचे नाव खाटीक सायदाबी इसा असे होते. माझे लग्नानंतर ते नाव बदलून शाईदा फारुक खाटीक असे झाले आहे. दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही.
प्रतिज्ञापत्र क्र.२५५२२४२०४१२६८१००६३८७१३
दिनांक -२५/११/२०२५

### नावात बदल

माझे लग्ना पूर्वीचे नाव जुबेदाबी शे. इसा खाटीक असे असून माझे लग्नानंतर ते नाव बदलून जुबेदा मुसा खाटीक असे झाले आहे दोन्ही नावाच्या व्यक्तींनी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही.
प्रतिज्ञापत्र क्र.२५५२२४२०४१२६८१००६३८६९६
दिनांक -२५/११/२०२५



### नशिबाची परिक्षा

**शनिवार दि . १४ फेब्रुवारी २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|
| १८० २७० ९०० | ९-१ | १४० १२८ ११९ |
| | | जोड ९०-३१-२४-५७-१८ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-६ | १२३ १५० ११४ |
| | | जोड ०३-२६-४५-१९-६७ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|
| २६० ३५० ११६ | ८-९ | १२६ १८० ११७ |
| | | जोड ८१-५९-७४-२०-९६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# आरटीओ कार्यालयातील अनागोंदीविरोधात आंदोलन

## गैरहजर अधिकाऱ्याच्या खुर्चीला पुष्पहार घालून 'गांधीगिरी'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयातील कथित अनागोंदी कारभार, एजंटगिरी आणि अवजड वाहतूक अधिकाऱ्यांच्या सततच्या गैरहजेरीविरोधात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात आले आहे.

कार्यालयात वेळेवर उपस्थित नसलेल्या खासगी अवजड वाहतूक अधिकाऱ्यांच्या निषेधार्थ त्यांच्या खुर्चीला पुष्पहार अर्पण करून 'गांधीगिरी'च्या माध्यमातून अनोख्या पद्धतीने निषेध व्यक्त करण्यात आला. या आंदोलनात छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, जिल्हाध्यक्ष योगेश वामन, धडक जनरल कामगार संघटनेचे श्रीधर शेलार, दत्ता वामन, सुभाष काकडे, गुलाब काकडे, मिलिंद कुलकर्णी, देवा,



ड. मोनिका अहिरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या आरोपांनुसार, अहिल्यानगर येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील खासगी अवजड वाहतूक अधिकारी कधीच वेळेवर हजर राहत नाहीत.

त्यांच्या गैरहजेरीत कार्यालयात एजंटांचा वावर वाढलेला असून, सामान्य नागरिकांना नियमांचे भय दाखवून कारवाई केली जाते, तर काहींना कथित हप्तेखोरीच्या माध्यमातून सुट दिली जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याच्या कामकाजाची सखोल चौकशी करावी, तसेच कार्यालयातील अनागोंदी कारभार तात्काळ थांबवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांचे निवेदन परिवहन आयुक्तांना पाठविण्यात आले आहे. शहरातील माळीवाडा पुणे बसस्थानक परिसरात खासगी ट्रॅव्हल्स व एजंटांचा मोठ्या प्रमाणावर वावर असून, बसस्थानकातच प्रवाशांची वाहतूक केली जात असल्याचेही आंदोलकांनी निदर्शनास आणून दिले. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांची धोकादायक पद्धतीने वाहतूक केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील अवजड वाहतूक हा देखील गंभीर प्रश्न बनला असून, यापूर्वी अवजड वाहनांच्या अपघातात अनेकांना जीव गमवावा लागल्याचे आंदोलकांनी नमूद केले.

तरीही संबंधित अधिकारी कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याने कारवाईत शिथिलता येत असल्याचा आरोप करण्यात आला. एजंटगिरी तात्काळ बंद करावी, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि वाहतूक नियंत्रणाबाबत कडक उपाययोजना कराव्यात, अन्यथा आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## द • ख • ल

### भाऊसाहेब कदम यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर



**अहिल्यानगर** : श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व मोलाचे योगदान दिल्याबद्दल भाऊसाहेब लक्ष्मण कदम यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव पाचव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार असून, त्यामध्ये भाऊसाहेब कदम यांची 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे आणि नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे यांनी ही माहिती दिली. भाऊसाहेब लक्ष्मण कदम हे टिळक रोड येथील ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटीच्या कार्यशाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी केवळ शैक्षणिक मार्गदर्शनच केले नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वावलंबी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित केले आहे.

### ३० हजारांची खंडणी; लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला

**अहिल्यानगर** : शहरातील एमआयडीसी परिसरात खंडणीखोरांनी दहशत माजविल्याची धक्कादायक घटना घडली आहे. निंबळक रोडवर एका वकिलाच्या वडिलांना अडवून दरमहा ३० हजार रुपयांची खंडणी मागत त्यांच्यावर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला करण्यात आला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाणे येथे राम घोलप याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी ड. अविनाश लांडे यांचे वडील गंगाधर लांडे हे गुरुवारी सायंकाळी हॉटेल सावली परिसरातून घरी जात असताना आरोपीने त्यांना अडवले. हॉटेल चालवायचे असेल तर दरमहा ३० हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी केल्यानंतर नकार मिळताच आरोपीने डोक्यावर लोखंडी रॉडने वार केला. हल्ल्यानंतर जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. गंभीर जखमी झालेल्या लांडे यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष शिंदे तपास करीत आहेत. घटनेमुळे एमआयडीसी परिसरात व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

### महाशिवरात्री निमित्त श्री आनंदेश्वर मंदिरात पारायणाची सुरुवात

**अहिल्यानगर** : महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वाच्या पार्श्वभूमीवर स्टेशन रोड येथील स्वामी अपार्टमेंटसमोरील श्री आनंदेश्वर महादेव व दत्त मंदिर परिसरात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. आदिशक्ती सार्वजनिक मित्र व महिला मंडळाच्या वतीने येथे 'शिवलीलामृत' पारायण सोहळा आणि ' नमः शिवाय' जप सुरू असून, या धार्मिक उपक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाले आहे. महाशिवरात्री निमित्त आयोजित या पारायण सोहळ्यास महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दररोज सकाळ-संध्याकाळ महिला मंदिरात एकत्र येऊन ' नमः शिवाय'चा सामूहिक जप करत आहेत. शिवलीलामृताचे पारायण भक्तिभावाने सुरू असून, भगवान शंकराच्या महिम्याचे गोड स्वरांतील पठण परिसराला आध्यात्मिक स्पर्श देत आहे.

## गुणवाडी तलावातून आवर्तन सोडण्याचे निर्देश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : तालुक्यातील गुणवाडी तलावातून येत्या १६ फेब्रुवारीपासून पाण्याचे आवर्तन सोडण्याचे निर्देश जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून पाण्याचे हे आवर्तन १२ दिवसांचे असणार आहे.तलावाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून पाणी सोडण्याची सातत्याने मागणी होत होती.

मात्र, यासाठी कालवा सल्लागार समितीची मंजुरी मिळणे आवश्यक होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे यांना सूचना देण्यात आल्या. त्यानंतर आमदार विक्रमसिंह पाचपुते व स्थानिक शेतकऱ्यांशी चर्चा करून आवर्तनाचा कालावधी निश्चित करण्यात आला.

१६ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या आवर्तनाच्या काळात पाण्याचा कोणताही अपव्यय होणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

## घारगाव-ढोरजा रस्त्याचे यशस्वी सीमांकन

### पोलीस बंदोबस्तात अतिक्रमणमुक्तीची कारवाई पूर्ण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : घारगाव ते ढोरजा या ग्राम १४० रस्त्याच्या हद्द कायम (हद्द खुणा दाखविणे) व अतिक्रमणमुक्तीचे काम दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

संबंधित रस्ता हा जिल्हा परिषद, अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीगोंदा यांच्या अखत्यारीत असून उपअभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. सदर कार्यवाही श्रीगोंदा तहसीलदार सचिन डोंगरे व भूमी अभिलेख अधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशानुसार करण्यात आली. यापूर्वी दिनांक २७ व २८ नोव्हेंबर २०२५ रोजी उपअधीक्षक, भूमी अभिलेख श्रीगोंदा यांच्या मार्फत संबंधित ३० गटांची मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. त्यानंतर दि. ११ फेब्रुवारी रोजी पोलीस बंदोबस्तात सर्व गटांची हद्द कायम करून मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांच्याकडून प्रत्यक्ष हद्दखुणा दाखविण्यात आल्या.

या प्रसंगी शिव पानंद शेतरस्ते चळवळीचे महाराष्ट्र राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, जि.प. सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीगोंदाचे उपअभियंता एस. एम. पांढरे, कनिष्ठ अभियंता जावेद हवालदार, पोलीस अधिकारी लता पुराणे, मंडळाधिकारी डी. आर. म्हेत्रे, ग्राममहसूल अधिकारी आर. डी. आघाव, ग्रामपंचायत अधिकारी बी. ए. माने तसेच औटी दादा, राम अडसरे गुरुजी, मच्छिंद्र पवार (श्रीगोंदा कृती समिती), जनक पानसरे (चांदवड तालुका कृती समिती सदस्य) यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

सदर कारवाईदरम्यान महेश पानसरे, नारायण खामकर, रघुनाथ खामकर, विश्वनाथ उकांडे, कांताराम थिटे, जिजाराम खामकर, वसंत पानसरे, शुभम पानसरे, अनिल पानसरे, जालींदर खामकर, पोपट खामकर, रामदास खामकर, अशोक थिटे, हनुमंत थिटे, प्रणित पवार, आवडाजी थिटे, सुरेश थिटे, संजय पानसरे, बाळासाहेब थिटे, शाहिदास थिटे, नागनाथ पानसरे, शिवाजी पानसरे, पांडुरंग पानसरे, सोमनाथ पानसरे, दिलीप थिटे, रावसाहेब थिटे, योगेश रायकर, यशवंत खामकर, अर्जुन आदी शेतकरी व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

या संपूर्ण प्रक्रियेत सर्व प्रशासकीय अधिकारी व शेतकरी बांधव यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याबद्दल शिवपानंद शेतरस्ते चळवळीच्या वतीने दादासाहेब जंगले यांनी आभार व्यक्त केले. या कारवाईमुळे घारगाव-ढोरजा मार्गावरील दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न निकाली निघाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## अतिवृष्टीने बाधित गावांतील नुकसानाची केंद्रीय पथकाकडून पाहणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात सार्वजनिक व खासगी मालमत्तेचे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर आपत्तीपश्चात गरजांच्या मूल्यांकनासाठी केंद्र शासनाच्या उच्चस्तरीय केंद्रीय पथकाने शेवगाव तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन झालेल्या नुकसानाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पथकामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी एम. विनोद, वंदना श्रीवास्तव, सुहास मोहंती, रोहित कुमार, वैशाली म्हस्के आदी अधिकारी उपस्थित होते.



**शेवगाव तहसील कार्यालयात आढावा**

पाहणी दौऱ्यानंतर केंद्रीय पथकाने तहसील कार्यालय, शेवगाव येथे सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडून नुकसानाच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेतला. तसेच नुकसानभरपाई व पुनर्बांधणी संदर्भातील विविध बाबींवर चर्चा करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

पथकासोबत उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, पाथर्डीचे तहसीलदार उद्धव नाईक, शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भास्कर पाटील तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय पथकाने पाथर्डी तालुक्यातील करंजी, देवराई, पारेवाडी तसेच शेवगाव तालुक्यातील वरूर बु. या गावांना भेटी देत नुकसानग्रस्त ठिकाणांची पाहणी केली. करंजी येथे राष्ट्रीय महामार्गावरील नुकसानग्रस्त पुलाची, बंधाऱ्याची तसेच पाझर तलावाची पाहणी करण्यात आली. अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली जमीन तसेच पिकांचे नुकसान झालेल्या ग्रामस्थांच्या शेतजमिनीची प्रत्यक्ष पाहणी करून पथकाने परिस्थितीची माहिती घेतली.

यावेळी ग्रामस्थ रफिक शेख यांच्याशी संवाद साधत नुकसानाची सविस्तर माहिती पथकाने जाणून घेतली. भविष्यात अशी आपत्तीजनक परिस्थिती उद्भवू नये, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या सूचना पथकाने संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## शोषित आश्रमशाळा शिक्षक-कर्मचाऱ्यांना न्याय द्या : लंके



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील खांडगाव (ता. पाथर्डी) येथील सद्गुरु रोहिदासजी अनुसूचित जाती प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील शोषित व वंचित शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तातडीने न्याय मिळावा, अशी ठाम मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. निवेदनात खासदार लंके यांनी नमूद केले की, संबंधित आश्रमशाळेला २०१३ पासून शासन मान्यता असतानाही २००७ ते २०१९ या कालावधीत कार्यरत २० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संस्थेच्या संचालक मंडळाने वर्षानुवर्षे वेतन न देता सेवा करून घेतली. केंद्र सरकारकडून नियमित अनुदान उपलब्ध असूनही कर्मचाऱ्यांचे आर्थिक व मानसिक शोषण झाल्याचा गंभीर प्रकार त्यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिला. केंद्रीय मंत्रालयाच्या ५ नोव्हेंबर २०२० च्या आदेशानुसार गंभीर आर्थिक अनियमितता व गैरव्यवस्थापनामुळे संस्थेच्या चारही प्रकल्पांचे अनुदान रद्द करण्यात आले आहे. तसेच १८ नोव्हेंबर २०२५ रोजी संस्थेच्या संचालक मंडळाविरोधात राज्य पातळीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र या प्रकरणात संबंधित कर्मचारी कुठल्याही प्रकारे दोषी नसून ते अन्यायाचे बळी असल्याचे खासदारांनी स्पष्ट केले. २६ जुलै २०१० च्या शासन निर्णयानुसार तसेच मुंबई प्राथमिक शिक्षण कायद्यान्वये आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता आदेश, सेवापुस्तिका आणि सेवासंबंधी सर्व लाभ देणे बंधनकारक आहे. तरीही आजतागायत हे लाभ न मिळाल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे नमूद करून, थकीत वेतन, सेवा मान्यता व सर्व कायदेशीर लाभ तत्काळ देण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी खासदार लंके यांनी केली.

## जामखेडमध्ये गोरगरिबांवर कारवाई

### धनदांडग्यांना सूट ? प्रशासनाच्या दुटप्पी भूमिकेवर संताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**जामखेड** : राज्यभर शासनाने अतिक्रमण हटाव मोहिमेला गती दिली असताना, जामखेड शहर व तालुक्यात मात्र प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे या मोहिमेलाच खो बसत असल्याचे चित्र आहे. नगरपरिषद, राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन, पंचायत समिती व तहसील कार्यालय यांच्या संथ आणि विस्कळीत कामकाजामुळे गोरगरिबांवर कठोर कारवाई होत असताना, धनदांडग्यांच्या अतिक्रमणांना मात्र मुदत व सूट दिली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. शहरातील सौताडा-जामखेड महामार्गाचे काम गेल्या तीन वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे. कोट्यवधींचा निधी मंजूर होऊनही काही भागात काम रखडले असून, रस्ता रुंदीकरणाच्या नियमांमध्येही विसंगती दिसून येत आहे.

आधी मध्यरेषेपासून दोन्ही बाजूंना ५० मीटर रुंदी अपेक्षित असताना, रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडे हस्तांतरित झाल्यानंतर उपलब्ध जागेतच काम सुरू करण्यात आले. परिणामी कुठे कमी तर कुठे अधिक रुंदीचा रस्ता तयार होत आहे. या प्रक्रियेत प्रशासनाने प्रथम हातोडा गोरगरिबांच्या टपर्या, शेड, पत्रे व छोट्या दुकानांवर चालविल्याचा आरोप होत आहे. अनेक छोट्या व्यापाऱ्यांना आपली दुकाने हटवावी लागली, मात्र प्रभावशाली व धनदांडग्यांच्या अतिक्रमणांबाबत कारवाई टाळली गेल्याने 'गोरगरिबांना उठ, धनदांडग्यांना सूट' अशी भावना नागरिकांत तीव्र झाली आहे. खर्डा रोड, नगर रोड व बीड रोड परिसरात नगरपरिषदेने गटार व पाणी योजनेसाठी सोडलेल्या जागांवरही पुन्हा अतिक्रमण झाल्याचे चित्र आहे. भविष्यात पुन्हा अतिक्रमण हटाव मोहिमा राबवाव्या लागणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अतिक्रमण हटविले जात असले तरी, हटविल्यानंतर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना नसल्याने ही कारवाई केवळ दिखावा ठरेल, अशी भीती व्यक्त होत आहे.

लोकप्रतिनिधी व प्रशासनाने एकत्रितपणे, कोणताही भेदभाव न करता सरसकट अतिक्रमणमुक्त जामखेड घडवावे, अशी मागणी आता सुजाण नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## अहिल्यादेवींच्या जिल्ह्यात एकल महिलांची संख्या सव्वा लाखांपार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : कोविड कोरोनाच्या महासंकटानंतर सामाजिक, कौटुंबिक व आर्थिक कारणांमुळे एकल महिलांची संख्या वाढताना दिसत आहे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यात ग्रामीण भागात जानेवारी २०२६ अखेर करण्यात आलेल्या शासकीय सर्वेक्षणानुसार तब्बल १ लाख २९ हजार ७७० एकल महिलांची नोंद झाली आहे. २०२३ च्या तुलनेत ही वाढ सुमारे २९ हजारांनी झाली असून, हा आकडा चिंताजनक असल्याचे चित्र समोर आले आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात २०२३ मध्ये अहिल्यानगर जिल्हा परिषदेने राज्यात सर्वप्रथम ग्रामीण भागातील एकल महिलांचे सर्वेक्षण केले होते. त्यावेळी चौदा तालुक्यांत १ लाख ७२६ एकल महिलांची नोंद झाली होती. या सर्वेक्षणात विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता तसेच प्रौढ कुमारिका यांचा समावेश आहे. नगरपालिकांतील व महानगरपालिका हद्दीतील महिलांचा समावेश त्या वेळी करण्यात आलेला नव्हता.

या सर्वेक्षणाच्या आधारे राज्यभर ग्रामीण व शहरी भागात एकल महिलांचे सर्वेक्षण व्हावे, अशी मागणी महाराष्ट्र साऊ एकल महिला समितीच्या वतीने करण्यात आली होती. समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी व राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे यांनी ही मागणी विधान परिषद उपसभापती, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मांडली होती. अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त चौंडी येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा एकल महिला सक्षमीकरण समिती स्थापन झाली.

या समितीच्या पुढाकारातून जानेवारी २०२६ मध्ये ग्रामीण भागातील सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. मात्र ग्रामीण भागात १०० टक्के सर्वेक्षण झाले असले तरी शहरी भागातील सर्वेक्षण अद्याप अपूर्ण आहे. ते पूर्ण झाल्यानंतरच अहिल्यानगर जिल्ह्यातील एकल महिलांचे वास्तव चित्र स्पष्ट होईल, असे मत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

## चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी जीवितहानी टळली

### शैक्षणिक सहलीच्या बसचा ओतूरजवळ अपघात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर** : नेवासा तालुक्यातील पिंपरी शहाली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शैक्षणिक सहल घेऊन निघालेल्या शेवगाव आगाराच्या एसटी बसचा गुरुवारी पहाटे ओतूरजवळ अपघात झाला. मात्र चालकाने प्रसंगावधान राखून बसवरील नियंत्रण शक्य तितके सांभाळल्याने मोठी जीवितहानी टळली. या दुर्घटनेत १४ विद्यार्थी व ४ शिक्षक किरकोळ जखमी झाले असून सर्वांची प्रकृती स्थिर आहे. मिळालेल्या माहितीनुसार, (क्र. एमएच-१४ एलएक्स-६७४७) ही बस पहाटे दीड ते दोनच्या सुमारास ओझर-लेण्याद्री येथे शैक्षणिक सहलीसाठी रवाना झाली होती. बसमध्ये इयत्ता तिसरी



ते सातवीपर्यंतचे ५३ विद्यार्थी व ६ शिक्षक प्रवास करत होते. अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर ओतूरपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर डोंगरवाडी परिसरातील छोटेखानी पुलाजवळ अचानक बसचे संतुलन बिघडले.

परिस्थिती गंभीर असल्याचे लक्षात येताच चालक राजेंद्र काकडे यांनी तत्काळ प्रसंगावधान दाखवत बस रस्त्याच्या कडेला वळवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बस पुलावरून खाली कोसळण्याचा मोठा धोका टळला. बस कठडा तोडून बाजूला पलटी झाली; मात्र सुदैवाने मोठी जीवितहानी झाली नाही. अपघातानंतर विद्यार्थ्यांमध्ये काही काळ घबराट पसरली होती. स्थानिक नागरिक, पोलिस प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. जखमी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना जवळील रुग्णालयात दाखल करून प्राथमिक उपचार करण्यात आले. उपचारानंतर सर्वांना सुरक्षितपणे त्यांच्या गावी रवाना करण्यात आले. दरम्यान, नियोजित चालक ऐनवेळी आजारी पडल्याने पर्यायी चालक म्हणून मुंबई मार्गावर अनुभव असलेल्या चालक राजेंद्र काकडे यांना कामगिरी देण्यात आली होती. अपघाताची माहिती मिळताच नारायणगाव, पुणे विभाग, अहिल्यानगर विभाग तसेच नाशिक विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून मदतकार्य वेगात राबविण्यात आले. या घटनेनंतर पालकांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते; मात्र सर्व विद्यार्थी सुरक्षित असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

द • ख • ल

# ‘आयुष-विकसित भारत महावर्ल्ड एक्स्पो’चे पुण्यात आयोजन

**डॉ. जोसेफ डायस व डॉ. अनिता कोल्हे यांची पत्रकार परिषदेत माहिती**

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या आयुष संचालनालयाच्या सहकार्याने ट्रिनिटी ग्रुप व चेंबर फॉर इम्पोर्ट, एक्स्पोर्ट अँड हेल्थ यांच्या संयुक्त विद्यमाने १८ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत तीन दिवसीय 'आयुष-विकसित भारत महावर्ल्ड एक्स्पो २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्समध्ये होणारा हा एक्स्पो पुणेकरांसाठी सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत विनामूल्य खुला राहणार आहे, अशी माहिती संयोजक आणि ट्रिनिटी ग्रुपचे अध्यक्ष डॉ. जोसेफ डायस यांनी पत्रकार परिषदेत दिली.यावेळी आयुष संचालनालयाच्या सहसंचालक डॉ. अनिता कोल्हे, अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राचार्य हेमलता जळगावकर, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ कॉलेज ऑफ आयुर्वेद व रिसर्च सेंटरच्या संचालिका डॉ. मीनल लाड, भारती विद्यापीठ आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश देशपांडे, टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या समन्वयिका डॉ. अपूर्वा संगोराम, झेडव्हीएम युनानी कॉलेजच्या विभागप्रमुख डॉ. फराह शिकलगार, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद रुग्णालयाच्या डॉ. स्नेहल पानसरे यांच्यासह पुण्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते.

# भूमी फाऊंडेशनच्या कार्याचे गायकवाड यांच्याकडून कौतुक

**वाघोली :** वाघोली पोलीस स्टेशन येथे नुकतेच पदभार स्वीकारलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी भूमी फाऊंडेशन संचालित ‘सावित्रीबाई कृषक कन्या निवासी प्रकल्पा’स सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी प्रकल्पातील शिस्तबद्ध व्यवस्था, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि निवासी शेतकरी कॅडेट्सच्या संगोपनाची पाहणी केली. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम स्तुत्य




असल्याचे त्यांनी सांगितले. मातृत्वाच्या भावनेतून उभारलेले हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

कॅडेट्सना मार्गदर्शन करताना गायकवाड म्हणाले, परिस्थितीला दुर्दैव न समजता तिच्यावर मात करा. जिद्द, परिश्रम आणि सकारात्मक विचार यांच्या बळावर कोणतेही स्वप्न पूर्ण करता येते. त्यांच्या या प्रेरणादायी विचारांमुळे विद्यार्थिनींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी संस्थेच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष डॉ. कैलास पवार यांनी अशा मान्यवरांच्या भेटीमुळे विद्यार्थिनींना नवी दिशा मिळते, असे सांगितले. प्रा. जयश्री वाळके यांनी आभार मानले. कार्यक्रमास मेजर बाळासाहेब हराळ, मेजर संभाजी बेंद्रे, ॲड. राऊ पाटील, ॲड. डोंगरे पाटील, धनराज वाळके पाटील, अध्यापिका अनिता पवार तसेच विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित

# सासवडच्या पालखी तळावर पंडित दिनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन

**माळशिरस :** जनसंघाचे संस्थापक सदस्य, प्रखर राष्ट्रवाद जोपासणारे व ज्यांच्या नावाने समाजातील तळागाळातील नागरिकांना योजनांचे लाभ मिळण्यासाठी सुरू करण्यात आलेली अंत्योदय योजना व एकात्म मानवतावाद विचारांचे प्रेरक पंडित दिनदयाळ उपाध्याय यांचा ५८ वा स्मृतिदिन सासवड येथील पालखी तळावर साजरा करण्यात आला.



सासवड शहर भाजप अध्यक्ष आनंदभय्या जगताप, सासवड नगरपालिकेचे पाणी पुरवठा सभापती माऊली गिरमे, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, सेवा निवृत प्राध्यापक सुरेश काकडे , बाळासाहेब मुळीक, युवराज होले यांसह अनेक मान्यवरांनी या प्रसंगी उपस्थित राहून दिनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

# भुलेश्वर देवस्थान महाशिवरात्री यात्रेस सज्ज

**माळशिरस, पुरंदर तालुका:** माळशिरस येथील भुलेश्वर देवस्थान महाशिवरात्री यात्रेस पूर्णपणे सज्ज झाले आहे. यात्रेच्या सुरळीत आयोजनासाठी आज येथे बैठक घेतली गेली, ज्यात सुरक्षा, दर्शन, पाणी व्यवस्था, गर्दी नियंत्रण आणि वाहन व्यवस्थापन यासंबंधी चर्चा करण्यात आली.

यात्रेदरम्यान होणारी वाहन कोंडी टाळण्यासाठी वाहने वन उद्यानाच्या बाहेर आडवली जातील. दर्शन मार्गावरील भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून मार्गावर मंडप लावण्यात आले आहे. ग्रामपंचायती व देवस्थानाच्या वतीने शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे.

ारोग्य सुविधा म्हणून मंदिराजवळ दोन दिवस आरोग्य सेवा व दोन रुग्णवाहिका तत्पर ठेवण्यात येणार आहेत. सुरक्षा बंदोबस्त जेजुरी पोलीस स्टेशनकडून पुरवला जाईल, तर विज वितरण कंपनीकडून वीज पुरवठा खंडित होणार नसल्याची हमी मिळाली आहे.

बैठकीत पुरंदर तहसीलदार विक्रम राजपुत, पंचायत समिती सदस्य माऊली यादव, आरोग्य अधिकारी, वनविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

सर्व तयारी पूर्ण असून, भाविकांना सुरक्षित व सुव्यवस्थित महाशिवरात्री अनुभव मिळेल याची खबरदारी घेतली आहे.



श्री क्षेत्र भुलेश्वर (ता-पुरंदर) येथे महाशिवरात्री यात्रा नियोजन बैठक घेण्यात आली .

# सौर ऊर्जेतून पुणे होणार हरित शहर

## सार्वजनिक ठिकाणी सौर प्रकल्प राबवणार – महापौर मंजुषा नागपुरे

**मास्मा रिन्युएबल एनर्जी एक्स्पो २०२६’चे महापौरांच्या हस्ते उद्घाटन**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील सर्वात मोठ्या ‘मास्मा रिन्युएबल एनर्जी एक्स्पो २०२६’ या सौर ऊर्जा प्रदर्शनाचे उद्घाटन आज महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. शिवाजीनगर येथील न्यू ॲग्रिकल्चर कॉलेज ग्राउंड येथे सुरू असलेल्या या तीन दिवसीय प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना महापौर नागपुरे यांनी पुण्याच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जा हा प्रभावी पर्याय असल्याचे सांगितले. बदलत्या हवामान परिस्थिती आणि वाढत्या ऊर्जा गरजांच्या पार्श्वभूमीवर शहरात व्यावहारिक व अंमलात आणता येण्याजोगे सौर प्रकल्प राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

महापौर नागपुरे यांनी महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून प्रायोगिक सौर प्रकल्प राबवून ते टप्प्याटप्प्याने शहरभर विस्तारण्याची तयारी दर्शवली. पुण्याच्या विकासासाठी महापालिका सकारात्मक पावले उचलणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी नगरसेविका मंजुषा खेडेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सत्यकी सावरकर, जर्मन इंडो इनोवेशन कॉरिडोर (ऋखखउ) चे संस्थापक उपेंद्र बर्वे, मास्माचे अध्यक्ष अमित कुलकर्णी, उपाध्यक्ष प्रदीप खाडे आणि माजी अध्यक्ष शशिकांत वाकडे उपस्थित होते.

हे प्रदर्शन आज (शनिवार) आणि उद्या (रविवार) सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांसाठी विनामूल्य खुले असून, सौर ऊर्जा क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाची माहिती व खरेदीची संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे.




# जेजुरी परिसरात कचरा पेटवल्याने केबल जळाली

## बोपगाव–तक्रारवाडी विद्युतपुरवठा खंडित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** जुनी जेजुरी परिसरात निष्काळजीपणे कचरा पेटवल्याने २२ केव्ही आणि ३३ केव्ही उच्चदाबाच्या वीज केबलला आग लागली, ज्यामुळे बोपगाव आणि तक्रारवाडी गावांचे वीजपुरवठा काही काळ खंडित झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (ता. १३) सायंकाळी सुमारे ५ वाजता जुनी जेजुरी भागातील केबल मार्गाजवळ साचलेला कचरा अज्ञात व्यक्तींनी पेटवला. आगीची तीव्रता वाढल्याने शेजारच्या २२ केव्ही आणि ३३ केव्ही केबलचे संरक्षणात्मक आवरण वितळले व केबल जळाली. परिस्थिती गंभीर असल्यामुळे संबंधित फीडरवरील वीजपुरवठा तातडीने बंद करण्यात आला.





घटनेची माहिती मिळताच, महावितरण जेजुरी ग्रामीणचे सहाय्यक अभियंता श्रीरंग मुत्तेपवार, सहाय्यक अभियंता संतोष करनोर, तसेच लाइनमन गव्हाणे, जगताप, किरण रोमन, लहुराज आवटे व काळाने या तांत्रिक पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून तातडीने दुरुस्तीची कार्यवाही सुरू केली. तसेच जेजुरी नगरपरिषद यांच्या अग्निशमन दलाला पाचारण करून आग आटोक्यात आणली गेली व पुढील धोका टाळण्यात आला.

वीजपुरवठा खंडित झाल्याने संबंधित गावांतील घरगुती ग्राहक, व्यापारी आस्थापने आणि लघुउद्योगांना काही काळ अडचणींचा सामना करावा लागला. केबलचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाल्याने दुरुस्तीला काही वेळ लागणार असून, पर्यायी मार्गाने वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत, असे सहाय्यक अभियंता संतोष करनोर यांनी सांगितले.यावेळी आयडिया आणि वोडाफोन कंपन्यांच्या केबल जळाल्यामुळे जेजुरी परिसरातील काही गावांचे मोबाईल नेटवर्क देखील काही काळ ठप्प राहिले.

# शिरूर तहसील कार्यालयात नियम मोडत मनमानी कारभार

**सामाजिक कार्यकर्त्याची तक्रार**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** येथील तहसील आणि तलाठी कार्यालयात नियम मोडत अधिकारी आणि कर्मचारी मनमानी कारभार करत असल्याची गंभीर माहिती सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी उघड केली आहे. त्यांनी याबाबत जिल्हाधिकारी आणि तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना निवेदनाद्वारे संबंधितांवर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.वाळुंज यांनी सांगितले की, शासनाचे स्पष्ट परिपत्रक असूनही तहसील कार्यालयात नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी तहसीलदारांनी कार्यालयीन परिपत्रक जारी केले, तसेच १३ ऑक्टोबर २०२५ रोजी तालुक्यातील इतर विभागांनाही सूचना दिल्या.परंतु प्रत्यक्षात अधिकारी आणि कर्मचारी दुपारी तीन वाजता कार्यालयाचे टाळे ठोकून निघून जातात. निवासी नायब तहसीलदार कार्यालईन वेळेत अनुपस्थित राहतात, महसूल शाखेत अनेक जबाबदार अधिकारी अनुपस्थित असतात. यासोबतच तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांकडे खासगी इसम कार्यरत असल्याचेही वाळुंज यांनी निदर्शनास आणले आहे.याबाबत आणखी गंभीर म्हणजे संबंधित मंडळ अधिकारी नागरिकांच्या तक्रारींवर उलट जाब विचारतात. वाळुंज यांनी सांगितले की, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:१४ वाजता मंडळ अधिकारी सतीश पंचरास यांनी त्यांना फोन करून अयोग्य शब्दांचा वापर केला आणि



‘‘तुम्ही प्लॅन करून आलात, गोड बोलून तक्रार केली‘‘ असे निराधार आरोप केले.वाळुंज यांनी म्हटले की, शासकीय नियम मोडत लोकांशी अशा प्रकारे वागणे अत्यंत अयोग्य आहे, तसेच लोकसेवकांची भूमिका विसरून नागरिकांवर जाब विचारण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे. त्यांनी शासनाच्या स्पष्ट निर्देशांची पायमल्ली हा केवळ शिस्तभंग नसून नागरिकांच्या हक्कांवर घाला असल्याचे म्हटले आहे.

तहसीलदार यांच्यासह जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी व निवासी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे उपलब्ध पुराव्यांसह तक्रार अग्रेषित करण्यात आली आहे , तहसीलदार यांनी याप्रकारी सर्व संबंधितांना नोटिस काढणार असल्याचे कळवले आहे- प्रशासनाने तात्काळ व निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कठोर कार्यवाही करावी; अन्यथा लोकशाही मार्गाने सामाजिक हितासाठी कठोर भूमिका घेण्यास भाग पडेल.

**–निलेश वाळुंज**
**(सामाजिक कार्यकर्ता)**

# शिरूर येथे श्रीमद् भागवत सप्ताह यशस्वीपणे संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शहरात दिनांक ३ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेला श्रीमद् भागवत सप्ताह कार्यक्रम अत्यंत भक्तिभावपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला.

या पावन धार्मिक उपक्रमात आदरणीय डॉ. पंडितजी काशिनाथ मिश्रा यांनी आपली ओघवती वाणी आणि रसपूर्ण कथनशैलीत श्रीमद् भागवत कथा भाविकांसमोर मांडली. कथेच्या माध्यमातून धर्म, भक्ती, संस्कार आणि जीवनमूल्यांचे अमृतमय संदेश उपस्थित भाविकांपर्यंत पोहोचविण्यात आले.

कार्यक्रमात शिरूर शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती दर्शवून कथानुभवाचा लाभ घेतला. कार्यक्रमादरम्यान भजन, कीर्तन, प्रभातफेरी, महाप्रसाद तसेच इतर धार्मिक उपक्रम अत्यंत भक्तिभावपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक मंडळ, सेवाभावी कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच स्थानिक व जिल्हास्तरीय पत्रकारांनी दिलेले सहकार्य मोलाचे ठरले.उपस्थित भाविकांनी या कार्यक्रमाबाबत आपले मत व्यक्त करताना म्हटले की, हा श्रीमद् भागवत सप्ताह शिरूर नगरीत धार्मिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण करणारा ठरला असून, भाविकांच्या मनावर सकारात्मक प्रभाव टाकणारा ठरला आहे.

# जय गिरनारी पायी पालखी उत्सव

## सोमेश्वर मंदिरात महाशिवरात्रीचे निमित्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर –** महाशिवरात्रीनिमित्त सोमेश्वर मंदिर येथे जय गिरनारी पायी पालखी सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडला. मंगळवारी, दि. १० रोजी मळद येथून प्रस्थान करून वलझडवाडीपर्यंत सोहळ्याचे रिंगण टाळ-मृदंगाच्या गजरात पार पडले. हजारो महिला-पुरुष भाविक सहभागी झाले.

बारामतीत उभे घोडे रिंगण : हरिकृपानगर, बारामती येथे हजारो दत्त भक्तांच्या उपस्थितीत अश्वाचे पहिले उभे घोडे रिंगण पार पडले. गुरुवारी, दि. १२ रोजी पणदरे, कोऱ्हाळे बुद्रुक, वडगाव निंबाळकर मार्गे सोहळा करंजे येथील सोमेश्वर मंदिरात मुक्कामी झाला.

संध्याकाळी आरती व महाप्रसाद : सोमेश्वर मंदिर परिसरात संध्याकाळी आरती पार पडली. वायाळ कुटुंबीय दरवर्षीप्रमाणे भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करतात. दुसऱ्या दिवशी लोणंद येथे मुक्कामीसाठी पालखी सोमेश्वर मंदिरातून सकाळी प्रस्थान झाली.

**भाविकांची मोठी उपस्थिती :** कोल्हापूर, सांगली, सातारा, बारामती, पुणे, बीड इत्यादी भागातील भाविक पालखी सोहळ्यात सहभागी झाले. सद्गुरू पडळकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा ोहळा पार पडतो.

**प्रवासात सुविधा व आरोग्यसेवा :** प्रत्येक मुक्कामावर जेवणाची सोय केली जाते. भाविकांना चहा आणि नाश्त्याची सोय दत्त भक्तांकडून पुरवली जाते. गेली १७ वर्षे गिरीनारी चॅरिटेबल व मेडिकल ट्रस्टद्वारे आरोग्यसेवा देखील उपलब्ध आहे.

सोहळ्याचे महत्त्व : पाच दिवसांत हा सोहळा वलझडवाडी येथे पोहोचतो. सोहळा प्रमुखांनी सर्व दत्तभक्तांनी सहभागी होऊन आनंद घेण्याचे आवाहन केले.



# कवठे येमाई ग्रामपंचायतीचा कडक इशारा

## थकीत पाणीपट्टी, घरपट्टी तात्काळ भरा; अन्यथा नळ कनेक्शन तोडणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील अष्टविनायक महामार्गालगत असलेल्या कवठे येमाई ग्रामपंचायतीने थकीत पाणीपट्टी व घरपट्टी वसुलीसाठी कठोर भूमिका घेतली आहे. दोन ते तीन दिवसांच्या आत थकीत रक्कम न भरल्यास संबंधितांचे नळ कनेक्शन तोडण्यात येणार असल्याचा निर्णय ग्रामपंचायतीच्या बैठकीत घेण्यात आला.

गेल्या काही दिवसांपासून गावठाणातील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने महिला ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयात धाव घेत तक्रारी नोंदवल्या. सरपंच मनीषा पांडुरंग भोर व ग्रामपंचायत अधिकारी



पूनम थोरात चितळकर यांच्याकडे महिलांनी पाणीटंचाईबाबत जाब विचारला.

ग्रामपंचायत प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीजवळील वीजपुरवठा खंडित झाल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. संबंधित विभागाशी संपर्क साधल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच गावठाणात योग्य दाबाने पाणीपुरवठा सुरू होईल, असा विश्वास ग्रामपंचायत प्रशासनाने व्यक्त केला.

दरम्यान, करवसुलीचा आढावा घेतला असता फेब्रुवारी महिन्याचा अर्धा कालावधी उलटूनही केवळ ४० टक्केच वसुली झाल्याचे समोर आले. गाव व गावठाणातील अनेक ग्रामस्थांकडे पाणीपट्टी व घरपट्टी अनेक वर्षांपासून थकीत असून, त्यामुळे ग्रामपंचायतीला विविध विकासकामे व दैनंदिन कामकाजात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सामाजिक कार्यकर्ते व उपस्थित ग्रामस्थांनी थकबाकी वसुलीसाठी ठोस आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याची मागणी केली. त्यानुसार, , थकीत रक्कम तात्काळ भरण्याचे आवाहन करण्यात आले असून, मुदतीत कर न भरल्यास संबंधितांचे नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे सरपंच व ग्रामपंचायत प्रशासनाने स्पष्ट केले.

# इंद्रायणी स्वच्छतेसाठी प्रशासन, ग्रामस्थ एकवटले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** इंद्रायणी नदी स्वच्छतेसाठी आळंदी नगरपरिषद व आळंदी देवस्थान व ग्रामस्थ यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लोकप्रतिनिधी, प्रशासन, वारकरी, ग्रामस्थ आणि विविध सामाजिक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी होत स्वच्छतेचा संदेश दिला. यावेळी आ.बाबाजी काळे, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, ॲड.रोहीणी पवार, पुरुषोत्तम महाराज पाटील, तसेच आजी-माजी पदाधिकारी आणि वारकरी साधक, शालेय विद्यार्थी, सामाजिक संघटना व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.सकाळी आठ वाजता मोहिमेला प्रारंभ झाला. नदी पात्रातील राडारोडा काढणे, कचरा संकलन, घाट परिसर स्वच्छ करणे अशी कामे हाती घेण्यात आली. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी स्वतः नदी पात्रात उतरून स्वच्छता करत प्रशासनाच्या कटिबद्धतेचे दर्शन घडविले. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे सपत्नीक मोहिमेत सहभागी झाले, तर आमदार बाबाजी काळे यांनीही प्रत्यक्ष सहभाग नोंदविला.नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी सांगितले, स्वच्छ इंद्रायणी हीच आपली खरी सेवा आहे. प्रशासन आणि नागरिक



एकत्र आले तर नदी स्वच्छतेचा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल. या अभियानाला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून पुढेही सातत्याने असे उपक्रम राबविण्यात येतील. वारकरी आणि ग्रामस्थांच्या सहभागामुळे वातावरणात भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संगम अनुभवायला मिळाला. स्वच्छ इंद्रायणी, सुंदरआळंदीकर ६ आळंदी हा संदेश देत नागरिकांनी नदी संवर्धनासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

इंद्रायणी ही आळंदीच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. नदी स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. अशा मोहिमांतून जनजागृती होऊन कायमस्वरूपी बदल घडेल.

**बाबाजी काळे, आमदार, खेड**

## महाशिवरात्र निमित्त करंजेतील

# सोमेश्वर मंदिर शिवभक्तांसाठी सज्ज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील प्रति सोरटी सोमनाथ यांचे रूप मानले जाणारे प्रसिद्ध श्री क्षेत्र करंजे येथील श्री सोमेश्वर स्वयंभू शिवलिंग मंदिरात येणाऱ्या रविवारी दि. १५ रोजी महाशिवरात्री यात्रा असणार आहे या अनुषंगाने विविध जिल्ह्यातून येणाऱ्या शिवभक्त भाविक स्वयंभू शिवलिंग दर्शन घेण्यासाठी येत असतात. येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून दरवर्षी सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट विविध सुख सोयी दर्शन रांगा पाणी याचे आयोजन करत असते महाशिवरात्र यात्रेची जय्यत तयारी केली आहे.

यात्रेनिमित्तमंदिर परिसरात साफसफाई करण्यात आली. तसेच आकर्षक विद्युत रोषणाई, भाविकांसाठी पार्किंग आणि मंदिर परिसरात साफसफाई करण्यात आली. तसेच आकर्षक विद्युत रोषणाई, भाविकांसाठी दर्शन रांगेची सोय, पिण्याच्या पाण्याची सोय अशा विविध सोयी करण्यात आलेले आहे

महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. सोमेश्वर कारखान्याच्या वतीने सुरू असलेल्या अतिरुद्र अनुष्ठान सोहळ्याची सांगता महाशिवरात्रीला होणार आहे. काही स्वयंसेवकही याठिकाणी उपलब्ध करण्यात आले आहेत. बारामती आगाराकडून यात्रेसाठी जास्तीच्या बस सोडण्यात आल्या आहेत. होळ प्राथमिक आरोग्य विभागही सेवेसाठी उपलब्ध असेल. भाविकांनी शिस्तीत दर्शन घेत देवस्थानला सहकार्य करावे, असे आवाहन सोमेश्वर देवस्थानचे अध्यक्ष अनंता मोकाशी, सचिव विपुल भांडवलकर यांनी केले आहे.



करजेतील श्री सोमेश्वर मंदिराला केलेली विद्युत रोषणाई.

वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन वतीने कोणत्याही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख पोलीस बंदोबस्त ठेवला आहे तसेच यांनी मंदिर परिसराची पाहणी करून सुरक्षेचा आढावा घेतला. भाविकांनी शिस्तीत दर्शन घेण्याचे आवाहन तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित केले आहेत.

**नागनाथ पाटील. सहायक पोलिस निरीक्षक**

महाशिवरात्र निमित्त विविध जिल्ह्यातील शिवभक्तांनी करंजे येथील सोमेश्वर स्वयंभू शिवलिंग दर्शनाचा लाभ घ्यावा असे नम्र आवाहन.

**अनंत मोकाशी.चेअरमन**

## द•ख•ल

### भातकुडगांव येथे महाशिवरात्रीनिमित्त हरीनाम सप्ताह



**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील भातकुडगांव येथे महाशिवरात्रीनिमित्त १३ फब्रुवारी ते १६ फेब्रुवारी या कालावधीत त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात झाली आहे. यावेळी श्रीमान मंत्रेश गौरांग दास प्रभुजी (भक्ती शास्त्री भक्ती वैभव वडोदरा गुजरात) यांचे तर महानंद चैतन्य दास प्रभुजी (भक्ती शास्त्री भक्ती वैभव पुणे) यांचे हरीकिर्तन होणार असून दि १६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत श्रीमान मंत्रेश गौरांग दास प्रभुजी यांचे काल्याचे किर्तन होईल त्यानंतर भाविकांना निवृत्ती काळे यांच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे तरी या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन माजी सरपंच राजेश फटांगरे यांनी केले आहे.

### दुर्मिळ 'रुका' सर्पाचे दर्शन; सर्पमित्रांच्या तत्परतेने सुरक्षित सुटका



**शेवगाव :** शहरातील आखेगाव रोड परिसरात एका घराच्या छतावर दुर्मिळ 'रुका' सर्प आढळून आल्याने नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले. माहिती मिळताच सर्पमित्र सुशांत मनवरे यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून सर्पाला सुरक्षितपणे पकडले.

मनवरे यांनी सांगितले की, 'रुका' सर्प हा पूर्णतः बिनविषारी असून अतिशय चपळ असतो. तो प्रामुख्याने झाडांवर वास्तव्य करतो. साधारण तीन ते सहा फुट लांबीपर्यंत वाढणारा हा सर्प दिवसा सक्रिय (दिनचर) असतो. अनेक भागांत त्याचे अस्तित्व आढळते, मात्र आपल्या परिसरात तो क्वचितच दिसतो. त्यामुळे हा सर्प दुर्मिळ मानला जात असून काही ठिकाणी नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

तसेच एप्रिल महिन्यात हा सर्प सहा ते सात अंडी घालत असल्याची माहितीही मनवरे यांनी दिली. पकडलेला सर्प कोणतीही इजा न होता नैसर्गिक व सुरक्षित अधिवासात सोडण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### डॉ. प्रशांत भोईटे यांना मेकॅनिकल इंजिनिअरिंग पीएच.डी. पदवी



**लिंपणगाव :** बेलवंडी (शुगर) येथील इंदिरा गांधी पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. प्रशांत दत्तात्रय भोईटे यांनीशंकूच्या आकाराच्या उष्णता विनिमयकांमधील तपासाचा उष्णता हस्तांतरण आढावा यांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर सखोल संशोधन करून सनराइज् युनिव्हर्सिटी राजस्थान येथून पीएच.डी.पदवी यशस्वीरित्या संपादन केली आहे.. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे चे अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे, जिल्हा मध्यवर्ती बँक संचालिका सौ.अनुराधा( वहिनी) नागवडे, व्हाईस चेअरमन सौ.मेघाताई औटी, कारखान्याचे सर्व संचालक मंडळ तसेच संस्थेचे निरीक्षक सचिन लगड यांचेही सतत मार्गदर्शन व पाठबळ लाभले. प्राचार्य डॉ. भोईटे यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक व संशोधन परंपरेत मानाचा टप्पा गाठला असून विद्यार्थी व सहकारी शिक्षकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे व्यवस्थापन, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## राज्य उत्पादन शुल्कची कारवाई

# १.८५ कोटींचा मद्यसाठा जप्त, आंतरराज्यीय टोळीचा संशय



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** परराज्यातून चोरट्या मार्गाने महाराष्ट्रात अवैध मद्याची वाहतूक करणाऱ्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने जोरदार हातोडा मारला आहे. निमगाव-खलु गावाच्या हद्दीत, निमगाव खलु टोल नाक्यावरील लेन क्र. ७ येथे पाळत ठेवून तब्बल १ कोटी ८५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभाग, मुंबई येथील भरारी पथकाने केली. अशोक लेलँड कंपनीचा क्ठ-४७-ऋ-३४९० क्रमांकाचा सहा चाकी कंटेनर ट्रक अडवून तपासणी केली असता, त्यात गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याचे १५०० बॉक्स आढळून आले.

वाहन चालक प्रेमकुमार जनकधारी सिंग यास महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत अटक करण्यात आली असून गुन्हा रजिस्टर क्र. ११६/२०२६ दि. १२ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांच्या आदेशानुसार, सह-आयुक्त प्रसाद सुर्वे, उपअधीक्षक रविंद्र उगले, निरीक्षक रियाज खान व विजयकुमार थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.तपास अधिकारी म्हणून दुय्यम निरीक्षक रुपेश चव्हाण काम पाहत असून, फिर्यादी विजय रघुनाथ ढवळे आहेत.पथकातील अधिकारी व जवानांनी समन्वयाने ही धडक मोहीम यशस्वी केली.

अहिल्यानगर विभागाकडून अधीक्षक प्रमोद सोनोणे, निरीक्षक बी. एस. घुगे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक पारधे व जवान अविनाश कांबळे यांनी मदत केली.राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून जनतेस आवाहन करण्यात आले आहे की, अवैध मद्य निर्मिती, विक्री किंवा वाहतूक याबाबत माहिती असल्यास संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच कायदा चुकवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी सावध राहावे. भरारी पथक आता 'ऑन मोड' मध्ये आहे. असेही सांगण्यात आले आहे.

### महसूलाला तडा आंतरराज्यीय टोळी सक्रिय?

या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर महसूल बुडविण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. प्राथमिक तपासात आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. तपास अधिकारी रुपेश चव्हाण यांच्याकडून या साखळीतील इतर दुव्यांचा शोध सुरू आहे. टोल नाका पार झाला असता तर माल बाजारात, आणि सरकारचा महसूल गेला असता अशी चर्चा विभागात ऐकू येत आहे.

## शाळा-हॉस्पिटलसमोरील आठवडे बाजारावर संताप

# नगरपालिकेविरोधात नागरिकांचा उद्रेक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरातील नाईक चौक ते गुगळे हॉस्पिटल हा अतिशय महत्त्वाचा व संवेदनशील मुख्य रस्ता दर बुधवारी भरवल्या जाणाऱ्या आठवडे बाजारामुळे अक्षरशः ठप्प होत आहे. परिणामी रुग्णवाहिकांना थेट हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचणे कठीण बनले असून, रुग्णांचे प्राण धोक्यात येण्याची गंभीर परिस्थिती वारंवार निर्माण होत आहे.

हा रस्ता शहरातील प्रमुख वाहतुकीचा मार्ग आहे. पाच ते सहा उपनगरांतील नागरिकांची दैनंदिन ये-जा याच मार्गावरून होते. पंचायत समितीकडे जाणारा रस्ता, जुनी पंचायत समिती रोड, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, वीर सावरकर मैदान, गुरुकुल शाळा आणि गुगळे हॉस्पिटल ही सर्व महत्त्वाची ठिकाणे याच मार्गावर असल्याने या रस्त्याचे महत्त्व अधिकच वाढते.




बुधवारी मुख्य रस्त्यावरच आठवडे बाजार भरवल्यामुळे परिसरात प्रचंड गोंधळ उडतो. लहान मुलांवर उपचार करणाऱ्या गुगळे हॉस्पिटलमध्ये नेहमीच रुग्णांची वर्दळ असते. मात्र बाजाराच्या अतिक्रमणामुळे म्बुलन्सना मार्ग मिळत नसल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची मोठी फरफट होत आहे. ही परिस्थिती नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. याच मार्गावर गुरुकुल शाळा असल्याने विद्यार्थी, पालक, महिला व ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. बाजाराच्या गर्दीत दुचाकी, हातगाड्या व वाहनांचा विळखा बसत असून अपघाताचा धोका वाढत आहे. शाळा व हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर बाजार भरवणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या व रुग्णांच्या जीवाशी थेट खेळ असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

### नगरपालिकेविरोधात नागरिकांचा संताप

ॲम्बुलन्स अडते, विद्यार्थी धोक्यात येतात, तरीही नगरपालिका ढिम्म आहे, असा संतप्त सूर नागरिकांतून उमटला. वेळेत ठोस निर्णय न घेतल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

नगरपालिकेने आठवडे बाजारासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली असतानाही अनेक विक्रेते नियम धुडकावून थेट मुख्य रस्त्यावर बसत असल्याचे चित्र आहे. याकडे संबंधित कर्मचचाऱ्यांकडून होत असलेले दुर्लक्ष पाहून नागरिकांमध्ये नगरपालिकेविरोधात तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करून बुधवारी नाईक चौक ते गुगळे हॉस्पिटल हा रस्ता पूर्णतः मोकळा ठेवण्याची तसेच आठवडे बाजार केवळ निश्चित जागेतच भरवण्याची ठाम मागणी केली आहे.

मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नाईक चौकात रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनास डॉ. ललित गुगळे, योगिता कुलकर्णी, इंजि. सुधीर फळे, राजू पाचरणे, नितीन सरोदे, कल्पेश शर्मा, राजेंद्र लुनावात, शंकर उदबले,हरीभाऊ सावर, भैरट करण, सुरेश साळवे, महेश काकडे,अभय वाकले, राहुल ढाकणे, सचिन धस, अमोल आठरे,राजेंद्र चितळे यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

### देशी बनावटीचे पिस्तूलसह एकास अटक

**शेवगाव :** पोलीस स्टेशनने गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या एका तरुणास अटक करून तब्बल छ२०,२५,६०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १२ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास आखेगांव रोड परिसरात एक काळ्या रंगाची विनानंबर स्कॉर्पिओ संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून वाहनाची तपासणी केली असता आरोपीकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल, एक मॅगझीन व दोन जिवंत काडतुसे आढळून आले याप्रकरणी जावेद मुनीर सय्यद वय २७, रा. आखेगांव रोड शेवगाव, जि. अहिल्यानगर यास अटक केली आहे त्याच्या ताब्यातून देशी बनावटीचे पिस्तूल

मॅगझीन, २ जिवंत काडतुसे, सॅमसंग २४ मोबाईल, गाडी असा एकूण छ२०,२५,६०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८५/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रामहरी खेडकर हे करीत आहे.

## अत्याचार प्रकरणातील आरोपीचे वकीलपत्र घेऊ नये

### रिपाइंची बार कौन्सिलकडे मागणी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील एका नावाजलेल्या शाळेत घडलेल्या धक्कादायक घटनेचा तीव्र निषेध करत आरोपी शिक्षकाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी करत या अत्याचार प्रकरणी आरोपी शिक्षकाचे आरोपी शिक्षकाचे आरोपपत्र घेऊ नये या मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने श्रीरामपूर बारकौन्सिलचे अध्यक्ष संदीप चोरमल यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले, इयत्ता दुसरीतील चार अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप वर्गशिक्षक सचिन महाजन गानोरकर यांच्यावर असून या प्रकरणामुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली आहे. त्यांनी पुढे या बोलताना सांगितले की, शिक्षक हा समाजातील अत्यंत जबाबदारीचा आणि सन्मानाचा घटक आहे. मात्र अशा प्रकारच्या घृणास्पद कृत्यामुळे शिक्षकी पेशाला आणि माणुसकीलाच काळिमा फासला गेला आहे. आरोपीस कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे. म्हणून या प्रकरणात कोणत्याही वकिलाने आरोपी शिक्षकाचे वकीलपत्र स्वीकारू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. अशा गंभीर गुन्ह्यात आरोपीला सामाजिक पातळीवर पाठबळ मिळू नये. पीडित मुलींना न्याय मिळवून देणे हे सर्वांचे कर्तव्य आहे, असेही त्रिभुवन यांनी स्पष्ट केले.

शहरातील विविध सामाजिक संघटनांनीही या घटनेचा निषेध करत आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्याची मागणी केली आहे. पीडित विद्यार्थिनी व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार व कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. या प्रकरणामुळे श्रीरामपूर शहरात खळबळ उडाली.

यावेळी ॲड. विजय पटारे, ॲड. डीएम त्रिभुवन, ॲड.अण्णासाहेब मोहन ड शाम खर्डे ,ड सर्जेराव घोडे, ॲड. बीबी शिंदे ॲड.वाबळे, ॲड.बीबी वाबळे, संजय राऊत, बोरगे रॉकी लोंढे आधी उपस्थित होते.

### आजपासून शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन

**ढोरजळगाव :** तालुक्यातील ढोरजळगाव शे येथे शिवरात्री निमित्त शनिवार १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान त्रिदिनी शिवलीलामृत पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ४ ते ६ काकडा,६ ते ७ शिवमहिमा स्तोत्र,७ ते१० शिवलीलामृत पारायण , सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ व ७ ते ९ दरम्यान जाहीर हरी किर्तन असे कार्यक्रमाचे स्वरूप असून शनिवारी ह.भ.प. सुनिता ताई महाराज गायके (अंबड), रविवारी ह.भ.प. सुदर्शन महाराज शास्त्री (त्रिभुवनेश्वर देवस्थान त्रिभुवनवाडी), यांचे तर सोमवारी ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर (कांबी) यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या धार्मिक कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ढोलेश्वर मित्र मंडळ व ढोलेश्वर महादेव मंदिर पाटेकर वस्ती ग्रामस्थांनी केले आहे.

### शेतकरी कुटुंबावर दरोडा; शस्त्राने हल्ला करून लाखाचा ऐवज लंपास

**अहिल्यानगर :** भिंगार जवळील निंबोडी परिसरात चोरट्यांनी उच्छाद मांडला असून, गुरुवारी पहाटेच्या सुमारास चार अज्ञात दरोडेखोरांनी एका शेतकरी कुटुंबाला लक्ष्य केले. कत्ती आणि चाकूचा धाक दाखवून चोरट्यांनी सुमारे १ लाख रुपयांचा मुद्देमाल लुटून नेला आहे. या घटनेत फिर्यादी विलास सखाराम आवारे यांच्या कपाळावर वार करून त्यांना जखमी करण्यात आले आहे..

मिळालेल्या माहितीनुसार, निंबोडी येथील आवारे मळा परिसरात विलास आवारे हे आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. दि. १२ फेब्रुवारी रोजी पहाटे एकच्या सुमारास तोंडाला रुमाल आणि मास्क बांधलेले चार चोरटे हातामध्ये हातमोजे घालून घरात शिरले. त्यांनी घरातील सदस्यांना चाकू आणि कत्तीचा धाक दाखवून दहशत निर्माण केली. यावेळी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, दरोडेखोरांनी फिर्यादी आवारे यांच्या कपाळावर कत्तीने प्रहार केला. या धाडसी दरोड्यामध्ये चोरट्यांनी २० हजार रुपयांची रोख रक्कम, सोन्याचे गंठण, कानातील दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू असा एकूण १ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला.

## लोकनाथ चषकामुळे ग्रामीण क्रिकेटपटूंना

# राज्यस्तरीय संधी : आ. संग्राम जगताप



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** लोकनाथ चषकाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील क्रिकेटपटूंना राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची मोठी संधी उपलब्ध होत असून, अशा स्पर्धा ग्रामीण खेळाडूंना व्यासपीठ देणाऱ्या ठरत असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त निघोज येथील वेताळबाबा स्टेडियमवर गुरुवार (दि. १२) ते रविवार (दि. १५) दरम्यान आयोजित लोकनाथ चषक राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

सुजित झावरे पाटील मित्र मंडळ व धर्मरक्षक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी भूषविले.

चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत निघोज परिसरासह शिरूर, पारनेर, अहिल्यानगर, पुणे व मुंबई परिसरातील नामवंत संघांनी सहभाग घेतला आहे. लाखो रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली असून लोकनाथ चषक जिंकण्यासाठी संघांमध्ये चुरशीच्या लढती रंगत आहेत. या स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखवण्याची व पुढील स्तरावर जाण्याची संधी मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून क्रिकेट असोसिएशनच्या पेक्स कौन्सिल सदस्या ड. कमल सावंत, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉ. भास्करराव शिरोळे, युवासेना जिल्हाप्रमुख नितीन शेळके, उद्योजक कैलास कोठावळे, माजी सभापती दिपक पवार, सरपंच पंकज कारखिले, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना आ. जगताप म्हणाले की, ग्रामीण भागात सातत्याने क्रीडा स्पर्धा झाल्यासच खेळाडूंना विभागीय व राज्यस्तरीय स्तरावर पोहोचण्याची संधी मिळते. सुजित झावरे पाटील यांनीही शासनाच्या क्रीडा प्रोत्साहन योजनांमुळे खेळाडूंना आर्थिक बळ मिळत असल्याचे सांगितले. लोकनाथ चषकाला मिळालेल्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे भविष्यातही अशा स्पर्धा आयोजित केल्या जातील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## चळवळीच्या निवेदनाची दखल

# जमाबंदी आयुक्तांचे शिव-पानंद रस्त्यांबाबत तातडीचे आदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून, चळवळीने सादर केलेल्या निवेदनाची दखल घेत जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांनी शिव-पानंद शेत रस्त्यांबाबत तातडीचे आदेश निर्गमित केले आहेत.

महसूल व वन विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नकाशावरील व शिव-पानंद शेत रस्त्यांची तातडीने मोजणी करणे, कायमस्वरूपी खुणा निश्चित करणे तसेच अतिक्रमणमुक्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे, मुख्यमंत्री बळीराजा शिव-पानंद शेत रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सोपी व सुलभ कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून प्रत्येक स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच शेत/पानंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, संबंधित रस्त्यांची ऋखड भू-संपादन व मॅपिंग आधारे मोजणी प्रक्रिया सुरू असल्याचे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील शेत रस्ते व पानंद रस्त्यांबाबत कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी सांगितले की, हा आदेश म्हणजे केवळ कागदोपत्री निर्णय न राहता , प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी. शासनाने आता तातडीने जिल्हा व तालुका स्तरावर मोजणी व अतिक्रमणमुक्तीची प्रक्रिया पूर्ण करावी.

शिवपानंद शेत रस्ता चळवळीच्या सातत्यपूर्ण संघर्षामुळेच हा निर्णय वेगाने मार्गी लागत असल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे. राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी हा आदेश दिलासादायक ठरत असून, आगामी काळात प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अन्यथा प्रत्यक्ष अंमलबजावणी कार्यात वेळ काढूपणा केला तर आझाद मैदान येथे आंदोलन केले जाईल असा इशारा पत्रकारांशी बोलताना दादासाहेब जंगले पाटील सांगितले

# दैनिक राष्ट्र सह्याद्री


## कुख्यात गुंड प्रताप ऊर्फ बाळा पवार एक वर्षासाठी स्थानबद्ध

**जामखेड :** तालुक्यातील सारोळा येथील कुख्यात गुंड प्रताप ऊर्फ बाळा हनुमंत पवार (वय ३२) याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कारागृहात रवानगी केली आहे.

प्रताप पवार याच्याविरुद्ध दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे तसेच जामखेड पोलीस स्टेशन येथे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. सरकारी कर्मचाऱ्यावर अग्निशस्त्राने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन, व्याजाच्या रकमेच्या वसुलीसाठी अपहरण व मारहाण, घातक शस्त्रांसह जबरी चोरी तसेच महामार्गावर दरोडा अशा अनेक गुन्ह्यांचा त्याच्यावर आरोप आहे. अटक व जामिनावर सुटका झाल्यानंतरही तो सातत्याने गुन्हे करत असल्याने परिसरात दहशत निर्माण झाली होती. त्याची वाढती गुन्हेगारी प्रवृत्ती व सार्वजनिक सुव्यवस्थेला निर्माण झालेला धोका लक्षात घेता, महाराष्ट्र झोपडपट्टी दादा व धोकादायक व्यक्ती अधिनियम १९८१ अंतर्गत त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. पोलिस अधीक्षकांच्या प्रस्तावानंतर जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी २७ मार्च २०२५ रोजी स्थानबद्धतेचा आदेश दिला.





# अवैध वाळू तस्करांवर 'कारवाई' सुरूच

## सलग दुसऱ्या दिवशी ४४ तराफे व साहित्य जाळून खाक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** जिल्हा प्रशासनाने अवैध वाळू उपशाविरोधात उघडलेल्या मोहिमेअंतर्गत नेवासा तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशीही धडक कारवाई करण्यात आली.महसूलचे उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने प्रवरा नदीपात्रात विविध ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणावर अवैध साहित्य नष्ट केले.

गुरुवारी दिवसभरात ३ टप्प्यात केलेली कारवाई: -१. नेवासा खुर्द (ज्ञानेश्वर मंदिर/लाडमोड टेकडी परिसर): प्रवरा नदीच्या काठावर ३६ थर्माकोलचे चप्पू आणि ५० लाकडी बल्ल्या जप्त करून जागीच जाळून नष्ट करण्यात आल्या. दुसरी कारवाई: नदीपात्रातील अन्य एका ठिकाणी थर्माकोलचे चप्पू नष्ट करण्यात आले. कापूर डोह: या भागात ४ चप्पू व १६ लाकडी बल्ल्या जाळून खाक करण्यात आल्या.गुरुवारी दिवसभरात एकूण ४४ तराफे/चप्पू आणि मोठ्या प्रमाणात लाकडी साहित्य नष्ट करण्यात प्रशासनाला यश आले आहे.

कारवाई दरम्यान बोटीमध्ये तांत्रिक बिघाड (पंक्चर) झाल्यामुळे खोल पाण्यातील कारवाई पूर्ण करता आली नाही तरीही नदीकाठावरील आणि उथळ पाण्यातील अवैध साधनांचा पूर्णपणे बिमोड करण्यात आला आहे.

प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कारवाईत प्रभारी तहसीलदार घोरपडे,निवासी नायब तहसिलदार चांगदेव बोरुडे, नेवासा तालुक्यातील सर्व मंडलाधिकारी सर्व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) महसूल सेवक यांनी सहभाग नोंदवला.

# शिर्डीच्या महिलेवर श्रीरामपुरात अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शिर्डी येथील ३५ वर्षीय महिलेचा विवाहाचे आमिष दाखवून विश्वास संपादन करत तिला श्रीरामपूर येथील एका लॉजवर नेऊन जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी श्रीरामपूर तालुक्यातील उंदिरगाव येथील मनोज गायकवाड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेचा पती दोन वर्षांपूर्वी निधन पावला आहे. कामधंद्याच्या शोधात असताना आरोपी मनोज गायकवाड याची तिच्याशी ओळख झाली. शिर्डीत पाहुण्याकडे ये-जा करताना आरोपीने तिच्याशी जवळीक साधत लग्नाचे आश्वासन दिले व तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपीने तिला श्रीरामपूर येथे भेटण्यास बोलावून एका लॉजवर नेले.

लग्नानंतरच शारीरिक संबंध ठेवू, असे पीडितेने स्पष्ट केल्यानंतर आरोपीने संतापून तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने संबंध प्रस्थापित केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

यानंतर तिच्या मुलांना मारण्याची व बदनामी करण्याची धमकी देत अत्याचार केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या घटनेप्रकरणी पीडित महिलेने श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली असून आरोपीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# स्टेट बँकेचे एटीएम फोडून लाखोंची रक्कम लंपास !



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** शहरातील नगर मनमाड महामार्गालगत संत गाडगे बाबा आश्रम शाळेसमोरील संत गाडगेबाबा व्यापारी संकुलातील स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम अज्ञात चोरट्यांनी दि. १३ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास फोडून लाखों रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली.

अज्ञात भामट्यांनी दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ५ वाजे दरम्यान संत गाडगे बाबा आश्रम शाळे समोरील स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम गॅस कटरच्या सहाय्याने फोडले. आणि एटीएम मधील २५ लाख ६७ हजार रुपये रोख रक्कम घेऊन भामटे पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच उप विभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, राहुरी येथील पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, सहाय्यक फौजदार तुळशीदास गीते, हवालदार संदिप ठाणगे आदी पोलिस पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अहिल्यानगर येथील श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. राणी या श्वानाने माग काढण्याचा प्रयत्न केला. मात्र श्वान एटीएम समोरच घुटमळले. पोलिस पथकाने परिसरातील सीसीटिव्ही कॅमेरे तपासून भामट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

या घटनेमुळे शहरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी संकेत चंद्रशेखर वैद्य यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक आहेर हे करीत आहे.

# सोलर पंप योजनेच्या नावाखाली सव्वा कोटींचा गंडा

**अहिल्यानगर :** शासनाच्या कुसुम सौर कृषी पंप योजनेचे सब-कॉन्ट्रॅक्ट मिळवून देण्याच्या बहाण्याने एका व्यक्तीला तब्बल १ कोटी २७ लाख रुपयांना गंडवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात छत्रपती संभाजीनगरमधील एका संशयिताविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून शहर परिसरात या मोठ्या आर्थिक लुटीमुळे खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सुजित भानुदास घोडके (रा. सावेडी, अहिल्यानगर) यांना आरोपी अभिजित पांडुरंग जाधव (रा. बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर) याने गाठले. आरोपीने आपण 'क्रीस्टल कॉर्पोरेशन' या फर्मकडून सौर पंपाचे सब-कॉन्ट्रॅक्ट घेणार असून, ते फिर्यादीच्या 'श्री एन्टरप्रायजेस'ला मिळवून देतो, असा विश्वास संपादन केला. यासाठी सिक्युरिटी डिपॉझिट भरावे लागेल, असे सांगून आरोपीने वेळोवेळी फिर्यादीकडून १ कोटी २७ लाख रुपये उकळले. पैसे देऊनही कॉन्ट्रॅक्ट मिळत नसल्याने आणि दिलेली रक्कमही परत मिळत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे घोडके यांच्या लक्षात आले. त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी अभिजित जाधव विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४) आणि ३१६ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आंधळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## हरेगाव गावठाण जलाशयाजवळ
# बिबट्या मृतावस्थेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे गावठाण शेजारी असलेल्या वसाहती जवळ व जलाशयाजवळ एक बिबट्या मृतावस्थेत आढळून आला.या ठिकाणी बिबट्याचा वावर नेहमी असल्याने त्या भागात भीतीमुळे कोणी जात नाही शुक्रवारी सकाळी राजू चव्हाण या नागरिकांने पाहिल्यानंतर सर्वांना त्याची सूचना दिली. हरेगाव शिरसगाव परिसरात तसेच बेलापूर साखर कारखाना जुन्या पिठाच्या गिरणीच्या भिंतीवर सतत दूध घेण्यासाठी लोक जात असताना अनेकांना बिबट्या दिसतो अनेक वेळा मागणी करूनही हरेगाव परिसरात वन विभागाने पिंजरा लावला नाही.



जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. शुक्रवारी आढळलेला बिबट्या हा दोन-तीन दिवसापासून मृत झाला असावा काहीच्या मते सर्पदंश अथवा इतर कारणांनी झाला असावा. कारण तिथे दुर्गंधी होती.हरीगाव उंदीरगाव ब्राह्मणगाव सतत दोन ते चार बिबट्या असावे असे नागरिकांना वाटते तरी याची गांभीर्याने दखल घेऊन या भागात वनविभागाने पिंजरा ठेवावा अशी मागणी माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील शिणगारे,सुभाष पंडित राजेंद्र मगर,नाना खरात आदींनी केली आहे. लोकप्रतिनिधीयांनी त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# साईदीप रुग्णालयात राडा

## गोळीबारातील जखमींच्या नातेवाइकांची कर्मचाऱ्यांना मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील साईदीप सह्याद्री रुग्णालयात गोळीबारात जखमी झालेल्या रुग्णांना उपचारासाठी आणल्यानंतर त्यांच्या नातेवाइकांनी मोठा राडा केला. यावेळी कर्तव्यावर असलेल्या जनसंपर्क अधिकाऱ्यासह वैद्यकीय कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी संजीव बन्सीलाल दायमा यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. गुरुवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास सुरज सादु फुलमाळी आणि नितीन विलास सिरसाट हे दोघे गोळीबारात जखमी अवस्थेत रुग्णालयात आले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच दोन्ही गटांच्या नातेवाइकांनी आपसात हाणामारी सुरू केली. मध्यस्थी करणाऱ्या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना आरोपी शाहरुख जावेद शेख, मयूर ठुबे, रवी आल्हाट, मदन जाधव आणि त्यांच्या इतर साथीदारांनी धक्काबुक्की व मारहाण केली. या गोंधळात जखमी नितीन सिरसाट याला डॉक्टरांनी मृत घोषित केले, तर सुरज फुलमाळी याच्यावर उपचार सुरू आहेत. तोफखाना पोलिसांनी या घटनेची दखल घेतली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# तिरट जुगार अड्ड्यावर छापा

## २१ जण अटकेत, ४.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहरातील बागडपट्टी परिसरात सुरू असलेल्या तिरट (हारजिती) जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाडसी कारवाई करत २१ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ४ लाख ९३ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, बागडपट्टी येथील ढोणे गल्ली परिसरात जुन्या वाड्याच्या भिंतीच्या आडोशाला काही इसम तिरट नावाचा हारजितीचा जुगार खेळत आहेत. या माहितीच्या आधारे सुपा पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांना तातडीने कारवाईचे आदेश देण्यात आले.

पोलीस निरीक्षक गडकरी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने अचानक छापा टाकून २१ आरोपींना रंगेहाथ पकडले. आरोपींकडून रोख रक्कम, २० मोबाईल फोन व जुगार साहित्य असा एकूण ४,९३,८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये संजीव रामचंद्र राऊत, अमर रुपा छाडेकर, गणेश प्रल्हाद चोभे, राहुल प्रकाट भट, यशवंत पंढरीनाथ ढोणे यांच्यासह इतरांचा समावेश आहे.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तोफखाना पोलीस करीत आहेत. पोलिसांच्या या संयुक्त कारवाईमुळे शहरातील अवैध जुगार अड्ड्यांवर मोठा आळा बसणार असल्याचे बोलले जात आहे.

# निळवंडे कालव्याचे पाणी वितरिका क्र.0३ द्वारे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत





निळवंडेचे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविणाऱ्या आ.आशुतोष काळे यांचा सत्कार करतांना वेस-सोयगाव,काकडीचे शेतकरी.

- **आ.आशुतोष काळेंच्या भगीरथ प्रयत्नाचे फलित**
  वितरिका क्र.0३ च्या माध्यमातून आमच्या बांधापर्यंत पाणी आले ते आमदार आशुतोष काळेंच्या भगीरथ प्रयत्नांचे फलित आहे. त्यामुळे आमच्या जिरायती गावातील मागील तीन पिढ्यांची निळवंडेच्या पाण्याची प्रतीक्षा आता कायमची संपली असून येणारा काळ हा समृद्ध असणार आहे. ज्यांच्यामुळे हा दिवस आम्हा शेतकऱ्यांना पहायला मिळाला त्या आमदार आशुतोष काळे यांच्यामुळे आम्हालाच नव्हे तर आमच्या पुढच्या पिढीलाही त्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे वेस-सोयगाव,काकडीच्या शेतकऱ्यांच्या वतीने आभार मानणे हे आमचे कर्तव्य आहे.-चंद्रकांत पाडेकर शेतकरी
- वितरिका क्र.0३ चे काम पूर्ण होवून करण्यात आलेली चाचणी यशस्वी झाली आहे. त्यामुळे वितरिका क्र.0३ च्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेती सिंचनाचा प्रश्न कायमचा सुटणार याचे समाधान आहे. वितरिका क्र.0४ चे कामही प्रगतीपथावर असून ते कामही तातडीने कसे पूर्ण होईल हा माझा प्रयत्न आहे. त्यामुळे वितरिका क्र.0४ चे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनाही सिंचनासाठी पाणी उपलब्ध होऊन त्यांचीही प्रतीक्षा संपणार आहे. **– आमदार आशुतोष काळे.**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदार संघाच्या जिरायती गावाला वरदान ठरणाऱ्या निळवंडे कालव्याचे पाणी आ. आशुतोष काळे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यातून जिरायती भागात ओढ्याच्या माध्यमातून पोहोचले आहे. परंतु बुधवार (दि.११) रोजी प्रमुख वितरीकाद्वारे हे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले असून त्यामुळे आनंदी झालेल्या वेस-सोयगाव, काकडीच्या शेतकऱ्यांनी कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावर आमदार आशुतोष काळे यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले आहे.

जिरायती ११ गावांना मागील कित्येक दशकांपासून निळवंडेच्या पाण्याची प्रतीक्षा होती. निळवंडे कालव्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर हे पाणी या ११ गावात आणण्यासाठी जुने ओढे-नाले उकरून तर काही ठिकाणी डोंगळे टाकून हे पाणी जिरायती गावात आमदार आशुतोष काळे यांनी पोहोचवून गावतळे, बंधारे, साठवण तलाव भरून देवून नागरीकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविला आहे. त्यामुळे ज्या जिरायती गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागत होते त्या गावांना आता टँकरची गरज राहिली नाही. तरी देखील राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.व आमदार आशुतोष काळे याच्या उपस्थितीत वितरीकांच्या कामांचे भूमिपूजन झाल्यापासून वितरीकांची कामे तातडीने कसे पूर्ण होतील व शेतकऱ्यांच्या शेतात वितरिकाद्वारे लवकरात लवकर कसे पाणी पोहोचवता येईल आणि हा जिरायती परिसर कसा सुजलाम सुफलाम करता येईल यासाठी ते बारीक लक्ष ठेवून होते.

ज्या ज्या वेळी या जिरायती भागात ते जात असत त्या त्यावेळी ते आवर्जून वितरीकांच्या सुरु असलेल्या कामाचा आढावा घेत असतात.सुरु असलेल्या वितरिका क्र. ३ व ४ पैकी क्र.0३ च्या वितरीकेचे काम पूर्ण होवून घेण्यात आलेल्या चाचणीत निळवंडे कालव्याचे पाणी कोणताही अडथळा व अडचण न येता पूर्ण क्षमतेने शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण पसरले असून सर्व गावातील शेतकऱ्यांच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी चंद्रकांत पाडेकर, सिकंदर इनामदार, सतीश म्हाळसकर, गिताराम पाचोरे, कारभारी पाचोरे, नजीर इनामदार, सुधाकर म्हाळसकर, जालिंदर कोल्हे, सोमनाथ कोल्हे, दत्तात्रय म्हाळसकर, सोपानराव म्हाळसकर, शिवाजीराव पाडेकर, बाबासाहेब गायकवाड, साईनाथ कोल्हे आदींसह शेतकरी उपस्थित होते.